# अर्थबोधपत्रिका

(आर्थिक, सामाजिक विषयांवरील विविध माहिती पोचविणारे माध्यम)

अंक १७ सप्टेंबर-ऑक्टोबर २००१

- वंशद्वेषावरील परिषदेत जातीभेदावर चर्चा ?
- छळांचे बळी
- निसर्गाभिमुख बाजारपेठेकडे ?
- जागतिक विषमता
- बालिकांचे घसरते प्रमाण
- रेस्टॉरंट्स-बार अर्थव्यवस्था !
- गांधी व नोबेल पुरस्कार
- बालहक्क कोड बील
- आरोग्यसंस्थांचा अनारोग्यकारक कचरा
- जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती धोकादायक ?
- कालप्रवाहात.........

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००१ पासून अर्थबोधपत्रिकेचे तिसरे वर्ष सुरू झाले असून तिसऱ्या वर्षाचा हा पाचवा अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा सतरावा अंक आहे.

पुढील सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य ५० रुपये (पन्नास रुपये फक्त) डिमांडड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टलऑर्डर/चेकने किंवा रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : अंक १७ : सप्टेंबर-ऑक्टोबर २००१**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध',रत्ना हॉस्पिटल जवळ ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक, अर्थबोधपत्रिका,अर्थबोध,९६८/२१-२२, रत्ना हॉस्पिटल जवळ, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

फोन: ५६५७१३२ / ५६५७२१० ई-मेल : ispe@vsnl.com

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | ३ |
| (१) मंगळग्रहावरील परिषदेत मातीभरावर चर्चा ? | ४ |
| (२) आरोग्यसंस्थांचा अनारोग्यकारक कचरा | ७ |
| (३) निसर्गाभिमुख बाजारपेठेकडे ? | ९ |
| (४) बालिकांचे घसरते प्रमाण | १३ |
| (५) रेस्टॉरंट्स-बार अर्थव्यवस्था ! | १४ |
| (६) जागतिक विषमता वाढतेय ? | १७ |
| (७) महात्मा गांधी व नोबेल पारितोषिक | २२ |
| (८) छळांचे बळी | २५ |
| (९) बालकांच्या हक्काबाबत कोड बील | २७ |
| (१०) जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती धोकादायक ? | २९ |
| (११) कालप्रवाहात......... | ३३ |


**सूचना** ●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ●अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ●लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

## वाचकांचा प्रतिसाद

**अर्थ**बोधपत्रिकेचे अंक आवडतात. विचार करायला लावतात. माहिती उपयुक्त आहे. उद्‌बोधक तर आहेच आहे.

डॉ. सिंधू जोशी, गोवंडी, मुंबई

**अर्थ**बोधपत्रिकेचा अंक १६ (जुलै-ऑगस्ट २००१) वाचला. यातील विविध विषयांचे लेख फारच माहितीपूर्ण आहेत. आज सामान्य वाचकालाही अशा विषयांची माहिती होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपण अतिशय अर्थपूर्ण असाच 'अर्थबोधपत्रिके'चा उपक्रम चालविला आहे.

सुधीर ब. देशपांडे, अंधेरी, मुंबई

**'अ**मृत'चे एक नियमित लेखक श्री. दिगंबर गाडगीळ, नाशिक यांच्याकडून 'अर्थबोधपत्रिके'चा (जुलै-ऑगस्ट २००१) अंक अवलोकनार्थ मिळाला. अंकाच्या मुखपृष्ठापासूनच त्याच्या वेगळेपणाची जाणीव झाली. आणि त्यातील सर्वच लेख वाचले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक अशा अंगांना स्पर्श करणारे लेख असलेला एक परिपूर्ण अंक वाचण्याचे समाधान वाटले. 'अर्थबोधपत्रिके'चे या आधीचेही अंक वाचण्याची उत्सुकता आहे व पुढील अंकही वाचण्यास आवडतील.

अनिल कुळकर्णी, अमृतच्या संपादकांकरिता, संपादक - मनोहर शहाणे, अरविंद पोतनीस, नाशिक

### *पर्यावरणाशी संबंधित क्योतो प्रोटोकोल अखेर मंजूर*

*पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर तयार करण्यात आलेल्या क्योतो प्रोटोकोलची अंमलबजावणी करण्याचा निर्णय १८० देशांनी नुकताच घेतला. २३ जुलै २००१ रोजी जर्मनीतील बॉन येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पर्यावरणाच्या इतिहासात ही एक महत्त्वपूर्ण घटना ठरणार आहे. अमेरिकेने हा प्रोटोकोल मार्च २००१ मध्ये फेटाळला होता. यासंबंधीचा लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या अंक क्रमांक १६ मध्ये (जुलै-ऑगस्ट २००१) पान क्रमांक १७ वर प्रसिद्ध करण्यात आला होता. सर्वात जास्त प्रदूषण करणाऱ्या अमेरिकेने यात सहभागी होण्याचे नाकारले तरी जगातील इतर राष्ट्रांनी अमेरिकेच्या मदतीशिवाय पुढे जायचे ठरविले आहे हे महत्त्वाचे !*

# संपादकीय

या 'अर्थबोधपत्रिके'त एक वादविषय सुरूवातीलाच मांडण्यात आला आहे. हा अंक वाचकांच्या हाती पडेल त्यावेळी दक्षिण आफ्रिकेतील दर्बान येथे वंशभेदावरील आंतरराष्ट्रीय परिषद चालू झालेली असेल. या परिषदेत वर्णद्वेषामुळे होणाऱ्या अत्याचारांविषयी विचारविनिमय होणार आहे. जगात इतरत्र असणारा वर्णद्वेषाचा प्रश्न भारतात नाही; पण काहींच्या मते, भारतातील जातींचा प्रश्न - विशेषत: दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचा प्रश्न याच स्वरूपाचा आहे, आणि तोही आंतरराष्ट्रीय पटलावर उमटायला हवा.

मागील अंकात 'इंटरनेट व बालबलात्कार' हा लहान मुलांच्या संदर्भातील भयानक प्रश्न मांडला होता. त्याच्याशीच नाते सांगणारा 'छळांचे बळी' हा लेख वाचकांना अंतर्मुख करील असे वाटते. त्याचप्रमाणे भारतातील सहा वर्षाच्या आतील लोकसंख्येत मुलींचे प्रमाण वेगाने घटले असल्याची अलीकडच्या शिरगणतीतून आलेली माहितीही आपल्या सामाजिक नीतीवर प्रकाश पाडणारी आणि वाचकांना विचार करायला लावणारी आहे, असे वाटते.

आर्थिक क्षेत्रातील अनेक प्रश्नांचा वेध 'अर्थबोधपत्रिका' नेहमीच घेत असते. भारतातील बदलत्या आर्थिक परिस्थितीत, गेल्या दहा वर्षात रोजगाराचे चित्र कसे बदलत गेले आहे याचा शोध घेताना, त्यात गुंफलेल्या सामाजिक घटनांकडे लक्ष वेधणारा 'रेस्टॉरंटस्-बार अर्थव्यवस्था' हा लेख, तसेच याच दशकात जागतिक पातळीवर विषमतेबाबतची परिस्थिती काय आहे हे सांगणारा लेख हे वाचकांना वर्तमान परिस्थितींची खोलवरची माहिती देतील असे वाटते. नेहमीसारखीच, वास्तवता नि विविधता या दोन्हींची सांगड घातलेली याही अंकात आढळेल.

महात्मा गांधींचे शांततेसाठी जगणे व मरणे आणि जागतिक शांततेसाठी असलेले मानाचे नोबेल पारितोषिक त्यांना न मिळणे ही आजपर्यंतची आश्चर्यकारक परंतु गुप्त राहिलेली गोष्ट. 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांना, नोबेल पारितोषिकाच्या संदर्भातील 'राजकीयता' उघड करणारी आहे.

अंक वाचकांना आवडेल, त्यांना त्याचा आपल्या मित्रमंडळींमध्ये प्रसार करायला आवडेल आणि स्वत: प्रतिक्रियाही द्याव्याशा वाटतील अशी आशा आहे.

■■

# वंशद्वेषावरील परिषदेत जातीभेदावर चर्चा ?

हिंदू समाजाची सुमारे गेली तीन हजार वर्षे स्थिरावलेली रचना म्हणजे जातीसंस्था होय...... ही संस्था आधुनिक अर्थाने सांस्कृतिक आहे. आधुनिक अर्थाने ती वंशवादी नाही. म्हणजे असे की, नॉर्डिक, भूमध्यसमुद्रीय, मंगोलॉईड, ऑस्ट्रेलॉईड व नेग्रिटो अशा प्रकारचे जे मानवांचे भिन्न भिन्न शारीरिक लक्षणांचे वंश शारीरिक मानवशास्त्राने ठरविले आहेत, त्या प्रकारच्या वंशभेदावर जातिसंस्था आधारलेली नाही किंवा गोरे पश्चिमी लोक व काळे अफ्रिकी लोक असे जे दोन वंश अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांमध्ये दिसतात व त्यावरून तेथील समाजसंस्थेत उच्चनीचभावदर्शक रचना निर्माण झालेली आहे तशा प्रकारची वंशवादी तत्त्वे जातिसंस्थेच्या रचनेत गृहीत धरलेली नाहीत, म्हणजे त्या अर्थाच्या भिन्न भिन्न जाती म्हणजे भिन्न भिन्न वंश नव्हेत असे, जाती व वंश यांतील भेद दाखविणारे विवेचन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे. असेच त्यांनी वर्णव्यवस्थेविषयीही म्हटले आहे. त्यांचे म्हणणे असे की "गेल्या अडीच-तीन हजार वर्षातील हिंदू समाज हा वंशदृष्ट्या संपूर्ण संकर झालेला समाज आहे. वंशशास्त्रदृष्ट्या हिंदू समाजातील वर्णव्यवस्था ही वंशभेदावर आधारलेली व्यवस्था नाही, म्हणून जातिसंस्थांचा विचार करीत असताना प्रथम वंशभेदाच्या कल्पनेचे विसर्जन करावयास पाहिजे."

परंतु जातीभेदाचा वंशभेदाशी संबंध बांधणारी नवी संकल्पना, वेगळ्या संदर्भात उदयास येत आहे. दक्षिण आफ्रिकेतील दर्बान येथे यंदा ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत, संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेली वंशद्वेषावरील परिषद होणार आहे. जगभरातील अनेक देश तेथे जमून, वांशिक भेद, वंशद्वेष, कट्टरवाद, असहिष्णुता अशा विषयांवर चर्चा करणार आहेत. परिषद सुरू होण्यापूर्वीच परिषदेविषयीची चर्चा गाजू लागली आहे. या परिषदेत, गुलामगिरी व पंथवाद यांवर चर्चा होणार असेल तर परिषदेवरच बहिष्कार घालण्याचा इरादा अमेरिकेने जाहीर केला आहे. कार्यक्रमाच्या मसुद्यात आक्षेपार्ह भाषा वापरली आहे, असेही अमेरिकेचे म्हणणे आहे. या परिषदेत गुलामगिरीबद्दल संबंधित देशांकडून भरपाईची मागणी व्हावी असा दबाव, 'ह्युमन राईटस् वॉच' या संघटनेने आणला आहे. तर इस्राईली सरकारकडून पॅलेस्टिनी नागरिकांना दिली

जाणारी वागणूक ही वंशद्वेष म्हणून मानली जावी, अशी अरब व आशियाई देशांची मागणी आहे. याच सुरात सूर मिसळून भारतातील काही दलित कार्यकर्त्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की या परिषदेत वांशिकभेदांप्रमाणेच जातीभेदाचीही चर्चा व्हावी.

'नॅशनल कँपेन ऑन दलित ह्युमन राईटस्' या संघटनेचे निमंत्रक मार्टिन मकवान यांचे असे म्हणणे आहे की ही परिषद केवळ वंशवादावर चर्चा करण्यासाठी भरविलेली नसून त्यात 'वांशिक भेद, परक्यांविषयीचे भय (झेनोफोबिया) व तत्संबंधी असहिष्णुता' यांवर चर्चा व्हावयाची आहे. आणि दलितांबाबतची भेद करणारी वागणूक ही वंशभेदाप्रमाणेच परंपरेने चालत आलेली आहे. त्यामुळे यावरही चर्चा होणे अगत्याचे आहे. तसेच दलितांना दिली जाणारी कमीपणाची वागणूक ही केवळ भारतातच नाही; तर, पाकिस्तान, बांगलादेश नि नेपाळ या देशांतही आढळून येते. थोडक्यात, केवळ वांशिकच नव्हे तर सर्वप्रकारच्या मानवी भेदांविरोधीच ही परिषद आहे आणि त्यामुळे जातीभेदाचा प्रश्न, पर्यायाने दलितांवरील अन्यायाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय परिषदेच्या वेशीवर टांगला जावा, अशी ही भूमिका आहे. अलीकडेच ४ ऑगस्टला या विषयीचे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यातही जात-वंश विषय चर्चेला आला. येथेही सर्वसामान्य सूर असा होता की, जातींचा प्रश्न राष्ट्राबाहेर वेशीवर टांगू नये.

भारत सरकारही दलितांचा प्रश्न हा, 'आंतरराष्ट्रीय प्रश्न' करायला राजी नाही; त्यामुळे दर्बानच्या परिषदेतही हा प्रश्न न्यायला सरकारचा विरोध आहे. भारताचे ॲटर्नी जनरल सोली सोराबजी म्हणतात, 'जात आणि वंश या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत.' अर्थात, भारतात आजही अस्तित्वात असलेली जातीभेदांची परिस्थिती ते अमान्य करीत नाहीत; पण या अंतर्गत बाबीत, परकीयांनी नाक खुपसावे असे सरकारला वाटत नाही. अर्थात, दक्षिण आफ्रिकेतील वर्णविरोधी कायद्याप्रमाणे भारतात मात्र अधिकृतरीत्या जातीभेदाला स्थान नाही. उलट आज संसदेत २० टक्के जागा अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव आहेत; शासकीय नोकऱ्या आणि शिक्षणव्यवस्थेत त्यांच्यासाठी राखीव जागा आहेत. अनेक राजकीय पक्षांत आणि शिक्षणव्यवस्थेत त्यांच्यासाठी राखीव जागा आहेत. अनेक राजकीय पक्षांत आणि मंत्रीमंडळांतून दलितांना प्रतिनिधित्व आहे. भारतातील अगदी सर्वोच्च स्थानी - राष्ट्रपतीपदावर आज दलित व्यक्ती मानाने स्थानापन्न आहे. याप्रकारच्या धोरणांमुळेही, दलितांचा प्रश्न हा वंश-वर्ण

भेदांप्रमाणे मानता येणार नाही असे सर्वसामान्य मत आढळते. मात्र दुसऱ्या बाजूस, दलितांच्या परिस्थितीबाबतचे वास्तवही दुर्लक्ष करण्यासारखे नाही. भारतातील सुमारे १६ कोटी लोकसंख्येच्या दलितांची सर्वसामान्यपणे आर्थिक नि सामाजिक परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. भारतातील गरिबांच्यात अनुसूचित जाती-जमातींचेच प्राबल्य आहे. बेरोजगार व्यक्तींमध्ये त्यांचीच संख्या लक्षणीय आहे.

अस्पृश्यता अजूनही नामशेष झालेली नाही. मागासलेल्या दलितांवर होणारे अन्याय, पुढे येऊ पाहणाऱ्या दलितांवर होणारे अत्याचार, दलित महिलांना सोसावे लागणारे सामाजिक-शारीरिक अत्याचार, बलात्कार, दलितांना, दलित वस्त्यांना जाळण्याचे प्रकार हे भारतीय सभ्यतेवरील काळे डाग आहेत. स्वतंत्र, न्याय्यतेचा आग्रह धरणारी राज्यघटना अंमलात येऊन अर्धशतक लोटले तरी समाजातील एक मोठा गट विषमतेचा, अन्यायाचा बळी ठरावा अशी परिस्थिती असलीच तर आपल्यावरील अन्याय उच्चरवाने जगाला सांगणाऱ्यांना कोण कसे थोपविणार ? आणि 'घरातले प्रश्न घरात सुटतील', याची हमी त्यांना कशी मिळणार ? आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतांतर्गत प्रश्नाला आणून काही वेगळे राजकारण खेळण्याचाही काही देशांचा डाव असू शकेल. तरीही प्रश्न नाकारता येत नाही. तो कोणत्या पातळीवर सोडवायचा हाच एक वेगळा प्रश्न होऊ पाहत आहे. ज्या दर्बानमध्ये गांधींजींच्या मनातील गुलामीविरोधी स्वातंत्र्य मशाल पेटली त्याच दर्बानमध्ये ही वंशविरोधी परिषद भरत आहे, हा केवळ योगायोग नसावा.

■■

*(संदर्भ - 'हिंदू', 'द इकॉनॉमिस्ट' आणि विषयासंबंधीचे अन्य वाङ्मय )*


## 'अर्थबोधपत्रिका' भेट अंक योजना

● 'अर्थबोधपत्रिका' या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एका छोटी मदत मागत आहोत.

● 'अर्थबोधपत्रिका' आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी **आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना वर्गणीदार होता येईल.**

# आरोग्यसंस्थांचा अनारोग्यकारक कचरा

कचरा हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग झाला आहे. वाढत्या जीवनमानाबरोबर कचऱ्यातही वाढ होते; आणि या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी असा प्रश्न निर्माण होतो. कचऱ्याचा हा प्रश्न गर्दीगर्दीच्या शहरांमधून तर आता अक्राळविक्राळ रूप धारण करून पुढे आला आहे. उदाहरणार्थ, मुंबईसारख्या बेटाच्या भोवतालच्या सर्व खाड्या कचऱ्यांनी बुजवून टाकल्या. मागील दोन पिढ्यांच्या कचऱ्याने हे काम केले. आता बुजवलेल्या भागांवर वस्ती वाढली आणि या वस्तीच्या वस्तूवापरांतून नवीन कचरा वाढत्या प्रमाणात पुढे आला. त्याचे काय करायचे ? 'एकदा वापरा नि फेकून द्या' या नवसंस्कृतीने तर अविचारी पद्धतीने कचऱ्याचे ढिगारे वाढवायला प्रेरणा दिली आहे. कचऱ्याचे स्थूल मानाने दोन प्रकार पडतात. एक, जमिनीत विरून जाणारा कचरा आणि दुसरा प्लास्टिकसारखा न विरणारा कचरा. प्रगत औद्योगिक संस्कृतीने जमिनीत न विरणाऱ्या कचऱ्याची मोठी निर्मिती केली आहे; नि पुढच्या पिढ्यांसाठी फार मोठी चिंता निर्माण करून ठेवली आहे.

एकूण कचऱ्याच्या या भयानक प्रश्नात, खास दखल घ्यायला हवी असा एक छोट्या कचऱ्याचा मोठा नि गंभीर प्रश्न पुढे आला आहे. तो आहे, हजारो हॉस्पिटलांनी निर्माण केलेला कचरा. एकूण कचऱ्यातील या कचऱ्याचे प्रमाण फक्त १.५ ते २ टक्के इतकेच आहे; पण तो माणसांच्या आरोग्याला अत्यंत धोकादायक असा कचरा आहे. रोग्यांवर उपचार करताना वापरल्या जाणाऱ्या अनेक वस्तू - कापूस, औषधांच्या बाटल्या, इंजेक्शनच्या नळ्या-सुया, रक्ताच्या बाटल्या, आणि अशा शेकडो लहान-मोठ्या वस्तू अखेर कचरा पेटीत जात असतात. अलीकडे एडस्-सारख्या रोगांच्या भीतीने काही वस्तूंचा पुनर्वापर टाळला जातो, त्यामुळेही अशा, प्रामुख्याने प्लास्टिकच्या डिस्पोजेबल वस्तूंचे, कचऱ्यामधील प्रमाण वाढत चालले आहे. त्याने प्रदूषण वाढत चालले आहे.

हा कचरा कुठे टाकायचा असा इस्पितळांपुढे प्रश्न असतो; बऱ्याचदा तो काही काळ इस्पितळाच्या आवारातच कुठेतरी साठवला जातो. कचरा गोळा करून नेणारे, त्यातील निवडक, इंजक्शनच्या सिरिंजसारख्या गोष्टी उचलून घेऊन पुन्हा विकतात; त्यांच्या पुनर्वापरातून फार मोठे धोके निर्माण झालेले आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या एका पाहणीने दाखवून दिले आहे.

एक ते दीड कोटी हिपॅटायटस-बी, तीस ते चाळीस लाख हिपॅटायटस-सी आणि ऐंशी हजार ते एक लाख साठ हजार एच् आय् व्हीची लागण, केवळ या पुनर्वापरातील निर्जंतुक न केलेल्या सुयांकरवी होत असल्याचा अंदाज, जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे.

वापरलेल्या कापसाची नि बँडेजेस्-चीही पुनर्विक्री होत असते, आणि खेड्यांकडे त्यांचा ओघ वळत असतो. अलीकडेच हा अवैध धंदा करणाऱ्यांचा एक गट पकडण्यात आला होता. खुद्द इस्पितळांमधील अशा तऱ्हेचा कचरा हाताळणारा नोकरवर्ग फार मोठा धोका पत्करत असतो; कित्येकदा त्यांना टिटॅनस, हिपॅटायटस-बी यांची प्रतिबंधक इंजेक्शने दिलेली नसतात. अनेक द्रवरूप औषधे सरळ मोऱ्यांमधून ओतली जातात; किंवा जमिनीवर फेकली जातात. त्यातून निघणारे विषारी वायू पसरत असतात. अनेकदा हा कचरा सामान्य कचऱ्यातच मिसळून फेकला जातो; त्यातूनही हा धोका संभवतो. हॉस्पिटल्समधील अनारोग्यकारक कचरा इनसिनरेटर्समध्ये जाळण्याची प्रथा आहे. हॉस्पिटल्स ही बहुधा निवासी विभागात, घराघरांच्या गर्दीत असतात. आणि इस्पितळांच्या फर्नेसमध्ये सर्व कचरा एकत्रच कमी उष्णतेने जाळला जातो. त्यातून विषारी वायू बाहेर पडून पसरू नयेत म्हणून आवश्यक ती काळजीही घेतली जात नाही. त्यामुळे अनेक प्रकारच्या रोगांना आमंत्रण दिले जाते.

भारतात या कचऱ्याचे, त्याच्या विल्हेवाटीचे काही व्यवस्थापन करायला हवे, शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याचे निर्जंतुकरण व्हायला हवे याकडे आजपर्यंत दुर्लक्षच होत आले आहे. परंतु जुलै २००० पासून काही नियम अंमलांत आणले आहेत. देशातील आठ महानगरांमधील आरोग्यसंस्थांनी, या कचऱ्याबाबत काळजी घेतली नाही तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे; यासाठी १९९८च्या कायद्यात आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. या कायद्याचा अंमल २००२ सालापासून साऱ्या भारतभर केला जाणार आहे. आता इस्पितळांना \दवाखान्यांना, कचऱ्याची विभागणी करून तो निर्जंतुक करावा लागणार आहे; तसेच त्याचा पुनर्वापर टाळण्यासाठी तो टाकून देण्यापूर्वीच, ओळखताही येणार नाही अशा स्वरूपात आणावा लागणार आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्याही पर्यायी पद्धती कायद्यात सुचविण्यात आल्या आहेत. या धोकादायक गोष्टींसाठी कठोर कायदे असणे अत्यावश्यकच आहे. परंतु कायद्याच्या पालनासाठी पुरेशी सामाजिक जाणीव असावी लागते.

*(संदर्भ - 'स्पॅन' डिसेंबर २०००)* ■■

आर्थिक

# *निसर्गाभिमुख बाजारपेठेकडे ?*

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बाजारपेठेला व त्यावर आधारित अर्थव्यवस्थेला फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. कोणत्याही देशाला आर्थिक विकास करायचा असेल तर या व्यवस्थेशिवाय दुसरा पर्याय नाही, अशी भावना सर्वत्र बळावत आहे. पण त्याचबरोबर जागतिक पातळीवर, यासंबंधीचे वादही निर्माण होत आहेत; आणि त्यामुळे या व्यवस्थेचे समर्थक व विरोधक असे दोन गट त्यातून तयार झाले आहेत. जास्तीत जास्त उत्पादन, जास्त वापर किंवा उपभोग आणि पर्यायाने अधिक नफा या त्रिसूत्रीकडे एक गट आकर्षिला जात आहे, तर दुसरीकडे उपभोग व नफा यांवर लक्ष केंद्रित करणारी ही व्यवस्था निसर्गाचे व मानवजातीचे नुकसान करीत आहे, असे अन्य एका गटाचे मत आहे. नेमका हाच मध्यवर्ती विषय घेऊन ब्रिटनमधील डेवॉन येथील 'शुमाकर कॉलेज' येथे अलीकडेच तीन आठवड्यांच्या चर्चात्मक अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आर्थिक विकासासाठी बाजारपेठेला सर्वतोपरी प्राधान्य देण्यात आले तरी जगातील आर्थिक विषमता वाढताना दिसत आहे. औद्योगिकरणामुळे निसर्गाचा विनाशच होत आहे. पर्यावरणाचा, प्रदूषणाचा व आरोग्याचा प्रश्न भेडसावीत आहे. असे का व्हावे ? समाजाचा सातत्यपूर्ण विकास होईल व निसर्गाचे नुकसानही होणार नाही, यासाठी या प्रचलित बाजारपेठीय व्यवस्थेला काही पर्यायी व्यवस्था उभी राहू शकेल का ? याचा विचार करणे, हेही या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट होते. ब्रिटनमधील व जगभरातील अनेक अभ्यासू, तज्ज्ञ व्यक्ती आणि विचारवंत यात सहभागी झाले होते. या चर्चेतून पुढे आलेले महत्त्वाचे मुद्दे या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

बाजारपेठीय अर्थव्यवस्था स्वीकारलेल्या अमेरिकेसारख्या देशात आजही सुमारे ६० टक्के नागरिकांचे राहणीमान बेतांचेच आहे आणि २० टक्के नागरिक तर आर्थिकदृष्ट्या वाईट स्थितीत राहतात असे आढळते. अमेरिकेतही गेल्या काही वर्षांत विषमता वाढलेली आढळते. (यासंबंधीचा एक लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या अंक क्रमांक ११ मध्ये पान क्र. ९ वर 'अमेरिका : वाढती विषमता' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आला आहे.) अमेरिका, ब्रिटन

यांसारख्या सधन देशांतील, तसेच तिसऱ्या जगातील राष्ट्रांमधील गरिबांची वाढती संख्या हा, या अभ्यासकांसाठी एक काळजीचा विषय होता.

**'टिना'कडून 'टामा'कडे**

ब्रिटनमधील डर्हम येथील बिशप डेव्हिड जेनकिन्स हे एक विचारवंत म्हणून सुपरिचित आहेत. १९९४मध्ये, बिशपपदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी अर्थशास्त्राचा व बाजारपेठेचा सखोल अभ्यास केला. नुकतेच त्यांचे 'Market Whys and Human Wherefores : Thinking again about Markets, Politics and People' या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. १९८०च्या दशकात, ब्रिटनच्या माजी पंतप्रधान मार्गारिट थॅचर यांच्या आर्थिक व सामाजिक धोरणांवर त्यांनी बरीच टीका केली होती. वरील पुस्तकावर आधारित विचार त्यांनी यावेळी मांडले. त्यामुळे जेनकिन्स यांचे या चर्चात्मक अभ्यास-क्रमातील नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले. या पुस्तकात एकीकडे त्यांनी, 'बाजारपेठ हा अर्थव्यवस्थेचा एक मोठा व आवश्यक घटक आहे, त्यातील किंमती ठरविण्याचे शास्त्र हे देवाण-घेवाणीसाठी फार उपयुक्त ठरले आहे,' असे म्हणून बाजारपेठीय व्यवस्थेचे थोडेफार समर्थन केले आहे. तर दुसरीकडे, 'केवळ बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था समाजाचे सर्वंकष हित साधू शकत नाही,' असे म्हणून ती नाकारलीही आहे.

ते म्हणतात की, बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा आग्रह धरणाऱ्यांचा 'टिना' म्हणजे 'There Is No Alternative - TINA, 'याला पर्याय नाही' असा एक दृढ समज आहे. त्यामुळे या 'टिना' देवतेची आराधना करण्यातच त्यांची शक्ती खर्ची पडते आहे. यातून समाजातील काही घटकांची भरभराट नक्कीच होताना दिसते. पण बहुतांश समाजाला त्याचे फायदे मिळत नाहीत; त्यामुळे सर्व घटकांचा समान विकास होऊ शकत नाही. तेव्हा संपूर्ण मानवजातीचा विकास करू शकणाऱ्या नव्या तत्त्वज्ञानाची आराधना करणे हे गरजेचे झाले आहे. म्हणूनच या समर्थकांचा 'टिना' हा समज दूर करून त्यांना 'टामा' म्हणजे There Are Many Alternatives - TAMA, 'अनेक पर्याय आहेत' ही आराधना शिकविण्याची वेळ आली आहे. आपल्या विधानाच्या पुष्टीसाठी ते, आंतरराष्ट्रीय संस्थांच्या व जागतिकीकरणाच्या विरोधात, अनेक ठिकाणी करण्यात येणाऱ्या निदर्शनांचा उल्लेख करतात. यातून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे, लोकांना धोरणात्मक बदल हवा आहे. हे घडून येण्यासाठी अशा चकमकी वा संघर्ष होणे अपेक्षित धरावे लागते. कारण 'टिना'कडून 'टामा'कडे

जाणे हे नक्कीच सोपे नाही. त्यासाठीचा मार्ग हा खडतर आहे, म्हणूनच तर संघर्ष गृहित धरला आहे. या मार्गावरून जाण्यासाठी एकदम सोप्या व सहज उपायांचा अवलंब केला तर आपण वेगाने उद्दिष्ट गाठू, ही कल्पनाही भ्रामक ठरेल, असा इशारा ते देतात. या मार्गावर जाण्यासाठी फार विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत. कोणतेही एक उद्दिष्ट गाठणे यापेक्षा निसर्गाचे सातत्य राखणारी व समानतेवर आधारित अशी, नवी मूल्यव्यवस्था उभी करणे हे उपयुक्त ठरेल.

ही मूल्यव्यवस्था उभी करण्याचा काळ हा किमान दहा वर्षांपासून चाळीस-पन्नास वर्षांपर्यंतही असू शकेल. कारण आजच्या आर्थिक विकासाच्या संकल्पनेला व जागतिकीकरणाला दूर ठेवणारा गट, हा पाखंडी समजला जाईल. आणि असे 'पाण्यात राहून मासळीशी वैर करणे' हे सहजशक्यही नाही. पण यातून वेगवेगळ्या मार्गाने हे काम होत राहील. म्हणजे काही गट या प्रक्रियेत राहूनच त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतील, तर काही विरोधाचा मार्ग स्वीकारतील आणि त्यातलाच एखादा गट नव्या पर्यायी वाटा शोधून त्याकडे समाजाला वळविण्याचा प्रयत्न करेल. खरे तर आतापर्यंतच्या आर्थिक धोरणांमुळे ज्या गटाने प्रगती केली, विकास व समृद्धी अनुभवली, त्याची जबाबदारी मोठी आहे. (अर्थात त्यांनी ती मानली तर !) सध्याच्या जागतिक विभागणीत या गटाला 'ग्लोबल नॉर्थ' व वंचित गटाला 'ग्लोबल साउथ' असे म्हटले जाते. हे केवळ जागतिक पातळीवर आहे असे नाही तर, प्रत्येक देशातच असे दोन गट आढळतात. ही विषमता दूर करण्याचे प्रयत्न म्हणजे 'टिना'कडून 'टामा'कडे वाटचाल करणे होय.

**'टामा'कडे म्हणजे निसर्गाकडे वाटचाल**

'शुमाकर कॉलेज'मधील अभ्यासकांनी या वाटचालीचा विचार करताना दोन जाहिरातींचा उल्लेख केला आहे. एक जाहिरात आहे क्रेडिट कार्ड कंपनीची. अवकाशाच्या पोकळीतील पृथ्वीचा निळसर गोल आपल्या तळहातावर दाखवून क्रेडिट कार्डचा प्रसार करणारी कंपनी ग्राहकाला म्हणतेय की,"आमच्या कंपनीचा कार्डधारक झालास की जगात तू कुठेही खरेदी-विक्री करू शकतोस. जणू जगच तुझ्या हातात आहे."

दुसरी जाहिरात आहे पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या एका गटाची. यात देखील पृथ्वीचा निळसर गोल ओंजळीत दाखविण्यात आला आहे. आणि हा गट ग्राहकाला आवाहन करतो आहे ते, या अवनीचे रक्षण करण्याचे, अवकाशातील

आपले घर जपण्याचे, वसुंधरेचा विनाश रोखण्याचे. पृथ्वीचे अतिशय आकर्षक छायाचित्र वापरून कल्पकतेने जाहिरात करण्याची ही कला दोन्ही जाहिरातीत आहे. पण त्यामागचा दृष्टिकोण मात्र वेगवेगळा आहे. क्रेडिट कार्डची जाहिरात करणारी कंपनी जगाचा 'फक्त एक बाजारपेठ' म्हणून विचार करते, तर पर्यावरणाचे रक्षण करू इच्छिणारा गट जगाचा विचार करतोय तो 'आपले घर म्हणून, निसर्गाची ही ठेव मानून.' या दोन दृष्टिकोणांमधील फरक हाच नेमका वादाचा मुद्दा आहे, आणि हा वाद कोणत्या वळणावर थांबतो, यावरच खरे तर पृथ्वीचे व मानवजातीचे भवितव्य अवलंबून राहील, असे मत यावेळी पुढे आले.

त्यामुळे बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचे आपण गुलाम न होता त्यात काही बदल करता येतील का ? याकडे चर्चा झुकली. यावेळी एक उदाहरण सांगण्यात आले. ते असे की, जर्मनीमध्ये सालमन मासे खाण्याचे प्रमाण वाढल्याने, हे मासे मिळणाऱ्या नॉर्वे, स्वीडन व स्कॉटलंड येथील व्यापाऱ्यांच्या मिळकतीत वाढ झाली. पण मासे पकडण्याचा अतिरेक झाल्याने माशांची संख्या एकदम कमी झाली व नैसर्गिक जैविक साखळी धोक्यात आली, तसेच दक्षिण अमेरिकेतील छोटे मच्छिमार अडचणीत आले. कारण त्यांच्या उपजीविकेच्या साधनांवर कुऱ्हाड कोसळली. म्हणजेच फायदा झाला तो 'ग्लोबल नॉर्थ'चा व नुकसान झाले ते 'ग्लोबल साउथ'चे. आणि बहुतांशवेळा सध्याच्या व्यवस्थेत असेच घडत असल्याचे आढळते, असे मत काहींनी व्यक्त केले. असे घडू नये यासाठी मानवता, समानता, नैसर्गिकता, भिन्न भिन्न संस्कृती, आचारविचार या सर्वांचा एकत्रित विचार करून नवी आचारसंहिता तयार करून, त्यावर आधारित नवी व्यवस्था उभी राहण्यासाठी काही प्रयत्न करण्यात यावे, असे सुचविण्यात आले.

अर्थात केवळ चार पर्याय सुचवून ही व्यवस्था बदलता येणार नाही तर त्यासाठी जागतिक पातळीवर नवा दृष्टिकोण अंगीकारण्याची आवश्यकता आहे. यात मर्यादित उपभोग, निसर्गाची व जैविक विविधतेची जपणूक, स्वार्थ बाजूला ठेवून समानतेची भावना वाढविणे, अशासारख्या तत्त्वांवर आधारित काळजी घेणारी अर्थव्यवस्था व बाजारपेठ उभी करावी लागेल. एकविसाव्या शतकातील जागतिक अर्थव्यवस्था ही 'कमीत कमी उपभोग पण जास्तीत जास्त व्यक्तींची गरजपूर्ती ' या तत्त्वावर आधारली तर ते मानवालाच हितकारक ठरू शकेल. *"जो जास्तीत जास्त गोष्टींचा उपभोग घेणे सोडू शकेल तोच सर्वात श्रीमंत"* अशी नवी व्याख्या आचरणात आणावी लागेल. होईल का हे शक्य ?

*(संदर्भ - रजनी बक्षी यांचे 'द हिंदू' या दैनिकातील लेख )* ■■

# बालिकांचे घसरते प्रमाण

नव्या शतकातील जनगणनेची आकडेवारी आता उपलब्ध झाली असून त्यातून काही निष्कर्ष मांडण्यात येत आहेत. २००१ मध्ये दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ एवढे असून, १९९१ मध्ये ते ९२७ एवढेच होते म्हणून समाजचिंतक समाधान व्यक्त करीत आहेत. पण जरा वयोगट बदलला की वेगळीच माहिती पुढे येते. ती अशी की, ० ते ६ या वयोगटातील मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण बरेच घटले आहे. दर हजार मुलांमागे फक्त ९२३ मुली असे हे प्रमाण आहे. १९९१ मध्ये हेच प्रमाण दर हजार मुलांमागे ९४५ एवढे होते. याचा अर्थ मुलींचा जन्मच होऊ दिला जात नाही किंवा जन्मानंतर त्यांच्या आरोग्याची योग्य ती काळजीच घेतली जात नाही, असा होऊ शकतो. आणि ही नक्कीच काळजीची बाब आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे यावर्षीच्या जनगणनेत प्रथमच एवढ्या लहान वयोगटाची आकडेवारी बाजूला काढण्यात आली आहे. कारण, असे केल्याने निरक्षरतेबाबतची नेमकी आकडेवारी व अधिक बारकावे उपलब्ध होऊ शकतील असे संबंधितांना वाटले. म्हणजे बालिकांचे घटलेले प्रमाण, हेही अगदी योगायोगाने पुढे आले आहे. ते मुद्दाम वेगळे काढण्यात आलेले नाही. मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या या प्रमाणात घटणे हे समाजहिताचे नाही. यातून भावी पिढीला काही वेगळ्या प्रश्नांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. याशिवाय दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण थोडेसेच वाढले यातही कौतुकाचा भाग नाही. कारण १९०१ पासूनची आकडेवारी बघितली तर स्त्रियांचे प्रमाण सतत घटलेलेच आहे असे आढळते. १९०१ मध्ये ते ९७२ होते; व कमी होत होत ते १९९१ मध्ये ९२७ होते. यात अपवाद फक्त १९८१ चा. तेव्हा हे प्रमाण ९३० वरून ९३४ झाले होते. म्हणजे आताचे ९३३ हे प्रमाण फार समाधान व्यक्त करण्यासारखे नाही, हे स्पष्ट होते.

नव्या शतकात नवे तंत्रज्ञान फार वेगाने पुढे जात आहे. पण समाजात त्याचा उपयोग बालिकांचा जन्म न होऊ देण्यासाठी मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या आरोग्याकडे प्रचंड दुर्लक्ष करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत समाज सुशिक्षित झाला असे म्हणायचे तरी कसे ? ■■

*(संदर्भ - इंटरनेटवरील माहितीच्या आधारे )*

# रेस्टॉरंटस्-बार अर्थव्यवस्था !

'राष्ट्रीय नमुना पाहणी संस्था' (नॅशनल सँपल सर्व्हे ऑर्गनायझेशन ) यांचे ५५ वे मंडल हे जुलै १९९९ ते जून २००० या कालावधीतील रोजगार-बेरोजगार याबद्दलची आकडेवारी आपल्यापुढे ठेवते. रोजगाराच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये दशकभराच्या काळात कसकसे बदल झाले आहेत, नवीन आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीनंतर रोजगार-बेरोजगाराच्या स्वरूपात काय बदल झाले आहेत, याचे अंदाज या आकडेवारीवरून येतात.

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीच्या १७ मार्च २००१ च्या अंकात के. सुंदरम् यांनी या आकडेवारीच्या आधारे काढलेले काही ठळक निष्कर्ष धक्कादायक आहेत. एक म्हणजे, या दशकात, लोकसंख्यावाढीच्या तुलनेत श्रमसंख्येत झालेली वाढ मंदगती आहे. दुसरे म्हणजे शेतीक्षेत्रातील श्रमसंख्या आणि या श्रमसंख्येचे एकूण श्रमसंख्येशी असलेले प्रमाण या दोन्हींमध्ये घट झालेली आहे. हीच स्थिती सामाजिक व व्यक्तिगत सेवाक्षेत्रात आढळून आली आहे. मुख्य गोष्ट अशी की महिला श्रमिकांची देशातील एकूण संख्या, दशकभरात जवळजवळ स्थिरच आहे आणि त्यातही ग्रामीण भागातील महिला श्रमिकांची संख्या १३ लाखांनी कमी झालेली असून जवळजवळ तेवढीच वाढ शहरी भागात झाली आहे. औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात रोजगारात अत्यंत अल्पशी वाढ झाली आहे तर वीज, गॅस, पाणीपुरवठा अशा क्षेत्रांतील रोजगारात बऱ्यापैकी घट झाली आहे. या सर्व आकडेवारीत उठून दिसणारी आकडेवारी आहे ती व्यापार, हॉटेल्स नि रेस्टॉरंटस् या क्षेत्राची. रोजगाराच्या दृष्टीने मोठी पारंपरिक क्षेत्रे म्हणजे शेती आणि उद्योगधंदे ही क्षेत्रे. आता या क्षेत्रांच्या पाठोपाठ तिसरा क्रमांक घेतला आहे तो व्यापार-हॉटेल-रेस्टॉरंटस् च्या क्षेत्राने. या क्षेत्रात १९९३-९४ साली २ कोटी ८५ लाख लोक काम करीत होते. ही संख्या, १९९९-२००० या वर्षात ४ कोटी १० लाखावर गेली आहे; म्हणजे दरसाल चक्रवाढ गतीने ६.२ टक्क्यांनी या क्षेत्रातील रोजगाराचा विस्तार होत गेलेला दिसतो. या क्षेत्रापाठोपाठ बांधकाम क्षेत्राचा क्रमांक लागतो.

गेल ऑमवेट यांनी 'हिन्दू' वृत्तपत्रात (७ व ८ मे २००१ ) दोन भागांत लेख लिहून 'व्यापार, हॉटेल्स व रेस्टॉरंटस्' या क्षेत्राच्या वाढीची आर्थिक व

सामाजिक स्वरूपाची शहानिशा केली आहे. एकीकडे शेती क्षेत्रातून, म्हणजे ग्रामीण भागातून बाहेर पडलेल्या लोकांना कुठे रोजगार मिळतो आहे तर तो या क्षेत्रात. कारण एकूण श्रमसंख्येपैकी फक्त ७.६ टक्के लोक, १९९३-९४ साली या क्षेत्रात गुंतले होते तर आता, म्हणजे १९९९-२००० साली ही टक्केवारी १०.४ वर गेली आहे. या वर्षी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात ४ कोटी ३० लाख लोक गुंतले होते तर त्याचवेळी या क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या ४ कोटी १० लाख इतकी म्हणजे उद्योगधंद्यांच्या क्षेत्रापेक्षा थोडीशीच कमी अशी आहे. याचा अर्थ असा की, नवीन आर्थिक धोरण अंमलांत आणल्यापासून घडलेला रोजगारविषयक महत्त्वाचा परिणाम हा उद्योगधंद्यांच्या किंवा माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातला नाही तर तो हॉटेल्स-रेस्टॉरंटस् च्या क्षेत्रातला आहे ही ठळक घटना आहे. आणि या ठळक घटनेचे वर्णन, गेल ऑमवेट 'रेस्टॉरंटस्-बार अर्थव्यवस्था' असे करतात.

ही रेस्टॉरंटस् नि बार आता ग्रामाण भागांतूनही पोचली आहेत. सर्व हमरस्त्यांवर तर त्यांचे पेवच फुटलेले दिसते. खाजगी बसगाड्यांचे थांबे हे या रेस्टॉरंटशी नाती जोडलेले असतात. तिथे हमखास असणाऱ्या दोन गोष्टी : एक, प्रसाधनगृहांची बऱ्यापैकी सोय आणि दोन, दारू पिण्याची सोय. अनेक 'सुपर बझार' आणि 'मार्केटस्' हमरस्त्यांवरील पेट्रोलपंपांपाशी किंवा गावागावांतूनही निर्माण होऊ लागली आहेत. भरपूर शहरी वस्तूंनी भरलेली आकर्षक दुकाने आता ग्रामीण भागात सवयीची होऊ लागली आहेत. याचबरोबर १९९० नंतरच्या काळात पान-तंबाखू-दारूचा उपभोग चार ते पाच पटींनी वाढल्याची आकडेवारी इतरत्र आहे.

देशात पर्यटन व्यवसायही फोफावत चालला आहे. मोठमोठी हॉटेल्स परदेशी पर्यटकांसाठी सेवा पुरवताहेत, तर देशातील लहान-मोठ्या शहरांतील हॉटेल्स मध्यमवर्गीय व उच्चमध्यमवर्गीयांना सेवा देताहेत. 'वाहतूक, साठवणूक व दळणवळण' या क्षेत्राचाही जो विकास होत आहे तो पर्यटनव्यवसायाशी सुसंगत असाच आहे. यातून घडते आहे ते असे की, ग्रामीण गरीब जो शेतीमधून बाहेर पडतोय तो उद्योगधंद्यात शिरत नाही, किंवा माहिती-तंत्रज्ञानाच्या 'मात' क्षेत्रातही शिरत नाही तर तो अशा पैसेवाल्या उच्च व उच्चमध्यमवर्गीयांना उपभोग्य सेवा पुरविणाऱ्या रेस्टॉरंटस्, हॉटेल्स, बार, कुरियर सेवा, जीप-रिक्षा वाहतुक, दुकाने आणि लक्झरी बसगाड्यांसाठी प्रवाशांना भरीस पाडणे, अशा कामांकडे वळत आहे. अर्थात, एकीकडे काही प्रमाणात का होईना ग्रामीण शिक्षित-अर्धशिक्षित युवकांना शेतीक्षेत्राबाहेर काही रोजगार उपलब्ध होतोय ही जमेची बाजू आहे. पण

दुसरीकडे ही परावलंबी अर्थव्यवस्था निर्माण होत आहे. उच्चवर्गीय नि उच्चमध्यमवर्गीयांचा छोटा गट, मोठ्या नोकऱ्या, नोकऱ्यांतील वाढते नि मोठे पगार, 'मात'क्षेत्रासारख्या नवीन तांत्रिक क्षेत्रातील संधींचे लाभ घेतोय आणि त्यांना तात्पुरत्या उपभोग्य सेवा देण्यात गरीब वर्ग, रोजगार प्राप्तीबाबत धन्यता मानतोय. तिसरीकडे, पुरेशा नि नियोजनबद्ध पाणीवापराच्या अभावी, आणि पाण्याच्या दुष्काळापोटी शेतीक्षेत्र खंगत चालले आहे. ग्रामीण भागात अजूनही वाहतूक दळणवळणाच्या पुरेशा नि बऱ्या दर्जाच्या सोयी उपलब्ध नाहीत. शहरी-ग्रामीण विकासातले अंतर वाढतच चालले आहे: विषमता तीव्र होत चालली आहे. गरीबांतले गरीब अजूनही निर्वाहपातळीवरच आयुष्य जगत आहेत.

■■

## नव्या धोरणांमुळे बेकारीत वाढ ?

अनेक विकसनशील देशांनी आपापल्या देशांच्या अर्थव्यवस्थेत चांगले बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या संस्थांनी सुचविल्याप्रमाणे दोन दशकांपूर्वी नवे आर्थिक धोरण स्वीकारले. त्यांना आलेले अनुभव असे - लॅटिन अमेरिकेतील देशांची निर्यात अपेक्षेप्रमाणे वाढली नाही, पण त्यांचे राष्ट्रांतर्गत एकूण उत्पादन (GNP) सुमारे ९.५ टक्क्यांनी घटले व बेकारीचा दर ७ टक्क्यांवरून ११ टक्क्यांपर्यंत वाढला. चिली, कोलंबिया, पेरू आणि व्हेनेझुएला येथील आर्थिक घडी एवढी विस्कटली की, बेकारी ५० टक्क्यांवरून १०० टक्क्यांवर पोचली. टांझानिया, झांबिया, मेक्सिको आणि पेरू येथील रोजंदारीत मोठी घट झाली. अर्जेन्टिना, बोलिव्हिया, चिली, कोस्टारिका, इजिप्त आणि केनिया येथेही रोजंदारीत फार मोठी घट झाली. अनेक देशांमधील गरिबी तर वाढलीच, शिवाय दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या नागरिकांच्या संख्येत मोठी भर पडली. या सर्व घडामोडींमध्ये गरीब वर्ग अधिकच भरडला गेला आहे. इतर देशांचे हे अनुभव पाहता भारतातही असे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. येथेही संघटित क्षेत्रातील रोजगारात घट झालेली आढळत आहेच.

■■

*(संदर्भ - 'पोलिटिकल इकॉनॉमी ऑफ रिफॉर्म्स अँड लिबरलायझेशन' या व्ही. एस. महाजन यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील राजेंद्रप्रसाद सिंग यांचा 'ग्लोबलायझेशन अँड वर्किंग क्लास: इंडियन एक्सपिरियन्स' हा लेख )*

सामाजिक

# जागतिक विषमता वाढतेय ?

मुक्त व्यापार, जागतिकीकरण, पर्यावरण याविषयांप्रमाणे 'जागतिक विषमता' या विषयानेही आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चेत, गेल्या वर्षभरात महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. देशादेशांमधील व व्यक्तीव्यक्तींच्या उत्पन्नातील असमानता, ही थोड्याथोड्या प्रमाणात सतत वाढत गेल्याने हा विषमतेचा प्रश्न आणखी प्रकर्षाने जाणवू लागला. आतापर्यंत गरिबी कमी करण्याच्या प्रयत्नांना जेवढे महत्त्व देण्यात आले, तेवढे महत्त्व विषमता दूर करण्याला देण्यात आले नाही. पण आता मात्र याकडे अभ्यासकांचे लक्ष गेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत देखील विषमता कमी झाल्याचे आढळत नाही, किंबहुना ती वाढतेच आहे, असे काही अभ्यासकांचे मत आहे.

**उत्पन्नाची विभागणी**

जागतिक पातळीवर उत्पन्न विभागणी (income distribution) मोजण्याच्या पद्धतींबाबत मतभेद आहेत. यापैकी कोणत्याही पद्धतीने उत्पन्नाची विभागणी पाहिली तरी, तज्ज्ञांच्या मते आतापर्यंतच्या अभ्यासावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे, देशादेशांमधील उत्पन्नामधील असमानता गेल्या काही वर्षांपासून वाढलेली आहे. १९८० नंतरच्या काळात (म्हणजे जागतिकीकरणाच्या सुरूवातीपासून आतापर्यंत) तर ती पूर्वीपेक्षाही वेगाने वाढली आहे, असेही म्हटले जाते.

**उत्पन्नातील असमानता का वाढली ?**

गेल्या काही वर्षांपासून ही उत्पन्नातील असमानता किंवा जागतिक विषमता का वाढली, हा खरा विचाराचा मुद्दा आहे. या प्रश्नाचे उत्तर चार भागात दिले जाते. एक म्हणजे, जगातील केवळ विकसनशील राष्ट्रांचा गट व विकसित राष्ट्रांचा गट या दोन्हींच्या आर्थिक वाढीची तुलना केली तर असे आढळते की विकसनशील राष्ट्रांच्या तुलनेत, विकसित राष्ट्रांमध्ये आर्थिक वाढ जलद झालेली आहे. दुसरा भाग म्हणजे, विकसित राष्ट्रांच्या तुलनेत विकसनशील राष्ट्रांमध्ये लोकसंख्येची वाढ कितीतरी अधिक झाली आहे. तिसरा म्हणजे, चीन, भारत व अफ्रिका या मोठ्या भूभागातील ग्रामीण भागात अतिशय संथ गतीने आर्थिक प्रगती झाली आहे. चौथा म्हणजे, चीन व भारत यासारख्या मोठ्या राष्ट्रांमध्ये

शहरी भाग व ग्रामीण भाग यांमध्ये उत्पादनातील व उत्पन्नातील दरी विस्तारत गेली आहे.

वरील चार बाबींचे काही गंभीर परिणामही लक्षात येतात. अलीकडच्या काळात तंत्रज्ञानातील बदल व आर्थिक उदारीकरणामुळे शहरांमधील उच्चमध्यमवर्ग व श्रीमंत, अधिकच श्रीमंत झाले. मर्यादित कुटुंब, शिक्षणाला दिलेले महत्त्व व शिक्षणाच्या उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधा यांमुळे हा वर्ग, समाजात कायम वरचढ राहिला. त्यामानाने निम्न वर्गात फारसे बदल झाले नाहीत. सधन वर्गाची श्रीमंती वाढण्याचा वेग व प्रमाण जास्तच राहिले. तर शिक्षणाच्या, आरोग्याच्या व कुटुंब नियोजनाच्या अपुऱ्या सोयीसुविधा, शिवाय उत्पन्नवाढीच्या मर्यादित संधी यांमुळे निम्न वर्गातील नागरिकांचे सरासरी उत्पन्न व क्रयशक्ती फारशी वाढली नाही.

त्यातच आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेत सधन राष्ट्रांकडून गरीब राष्ट्रांकडे अनेकविध वस्तूंचा ओघ वाढला. त्यामानाने या गरीब राष्ट्रांची निर्यात वाढली नाही व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा उपयोग त्यांना, उत्पन्न वाढविण्यासाठी करून घेता आला नाही. थोडक्यात उदारीकरणाच्या प्रकियेचा, व्यापाराचा व तंत्रज्ञानातील बदलांचा, गरीब देशांना व तेथील गरीब नागरिकांना अपेक्षित फायदा मिळाला नाही. या परिस्थितीत देशादेशांमधील श्रीमंत व मध्यमवर्ग आणि मध्यमवर्ग व गरीब यांच्यातील दरी, ही सतत वाढतच गेली.

**सामाजिक अस्थैर्याकडे ?**

एकीकडे उत्पन्नातील असमानता वाढत असतानाच दुसरीकडे नवे ध्रुवीकरण होत असल्याचे आढळते. सामाजिक व आर्थिक स्थैर्याचा प्रदेश व अशांततेचा प्रदेश, अशी जगाची विभागणी यातून होत गेलेली दिसते. आफ्रिका, मध्यपूर्वेकडील काही राष्ट्रे, रशिया, मध्य व पूर्व आशिया या भागांतील नागरिकांना गरिबी व दारिद्र्य अनुभवतानाच दूरचित्रवाणीवरून आलिशान मोटारींमधून फिरणाऱ्या श्रीमंतीचे दर्शन घडत गेले. या परिस्थितीत विषमतेने ग्रासलेल्या, बेकारीने त्रस्त झालेल्या तरूण पिढीला नवतंत्रज्ञान हे, सामाजिक व आर्थिक स्थैर्याचे एक साधन वाटले. ज्यांना शक्य आहे, ते या अस्थिर परिस्थितीत राहणे टाळतात, त्यामुळे श्रीमंत देशांकडे होणारे स्थलांतर वाढत जाते. श्रीमंत देशही काही गरजांपोटी या बाहेरच्या नागरिकांना सामावून घेतात. पण त्या देशांमधील स्थानिक जनता बऱ्याचदा या परकीय लोंढ्याच्या विरोधात असते. त्यावेळी श्रीमंत देशांमधील ही जनताही आंदोलन उभारण्याचा मार्ग

अवलंबिते. याही एका वेगळ्या कारणाने का होईना, पण जागतिकीकरणाला मोठा व संघटित विरोध हा श्रीमंत समजल्या जाणाऱ्या उत्तर अमेरिका व युरोप या राष्ट्रांतील काही गटांकडून होतो आहे, ही वस्तुस्थिती आहे. या देशांतील एक पर्यावरणवादी गटही, अर्थातच जागतिकीकरणाच्या विरोधात उभा ठाकला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना, जागतिक बँक या सर्वांच्या महत्त्वाच्या बैठकांच्या वेळी जागतिकीकरणाच्या विरोधकांची आक्रमक निदर्शने ही, पश्चिमेकडील राष्ट्रांमध्ये नेहमीचीच बाब झाली आहे. इटलीमधील जिनोआ येथे अलीकडेच (२० ते २२ जुलै २००१) श्रीमंत राष्ट्रांच्या 'जी-आठ' या गटाची बैठक झाली. त्यावेळी देखील जागतिकीकरणाच्या विरोधकांनी निदर्शने केली.

**विषमतेबाबत तज्ज्ञ म्हणतात...**

*हार्वर्ड विद्यापीठातील 'सेंटर फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट'चे संचालक व अर्थशास्त्राचे प्रोफेसर जेफरी सॅक्स* यांचा जागतिकीकरणा--संबंधीचा एक लेख नुकताच 'इकॉनॉमिक टाइम्स'ने (१९ जुलै २००१) प्रसिद्ध केला होता. त्यातील काही मुद्यांचा उल्लेख येथे महत्त्वपूर्ण ठरेल. त्यांनी म्हटले आहे की, "अशा जागतिक बैठकांमधील चर्चांमधून ही श्रीमंत राष्ट्रे, आंतर - राष्ट्रीय पातळीवर मुक्त व्यापार हाच सर्व राष्ट्रांसाठी फायद्याचा आहे, हेच सतत सांगत असतात व इतर राष्ट्रांनी त्या दिशेने कसे जावे, याबद्दलचे उपाय व मार्ग सुचवीत असतात. पण आर्थिक विकासासाठी मुक्त व्यापार महत्त्वाचा असला तरी, तोच एकमेव परिपूर्ण मार्ग नाही, हे सत्य ते विसरतात. तसेच या व्यापारातून आजपर्यंत विकसित व प्रगत राष्ट्रांचाच फायदा झाला आहे, ही वस्तुस्थितीही नजरेआड करतात. मुक्त व्यापाराची फळे विकसनशील राष्ट्रांपर्यंत पोचलेली नाहीत. जागतिक उत्पादन प्रक्रियेतील या राष्ट्रांचा सहभाग वाढल्याशिवाय त्यांना याचा फायदा होणे कठीणच आहे. त्यामुळे या श्रीमंत देशांनी जागतिकीकरणाचे फायदे व तोटे समजून घेऊन, गरीब राष्ट्रांना मदत करण्याचे धोरण आखले पाहिजे."

*नोबेल पुरस्कार विजेते अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन* यांचा जागतिकीकरणा-वर एक मुलाखतवजा लेख 'लॉसएंजेलिस टाइम्स सिंडिकेट इंटरनॅशनल'तर्फे नुकताच प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यात विषमतेबाबत त्यांनी म्हटले आहे की, "टोकाची श्रीमंती आणि प्रचंड दैन्यावस्था या दोहोंच्या पार्श्वभूमीवर जागतिक आर्थिक व्यवस्थेचा विचार केला पाहिजे. या विरोधाभासामुळेच

सध्याच्या व्यवस्थेबाबत संशय निर्माण होतो आहे. जागतिकीकरणाचे फायदे सर्वच देशांना व देशादेशांमधील विविध घटकांना सारख्या प्रमाणात मिळतात का ? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

जागतिकीकरणाचे विरोधक नेहमीच असे म्हणतात की, जागतिकीकरणामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत झाले व गरीब आणखी गरीब झाले, पण गरिबी व विषमता नेमकी कोणत्या निकषांवर मोजली जाते, यावर ते अवलंबून असते. काहीही असले तरी जगातील भयावह गरिबी व गोंधळात टाकणारी विषमता याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहेच. जागतिकीकरणाला पाठिंबा देताना अनेक धोरणात्मक मुद्यांचा ऊहापोह करण्याची तसेच ज्या शंका वा प्रश्न उपस्थित केले जातात, त्यांचे योग्य प्रकारे निरसन करण्याची आवश्यकता आहे."

**गंभीरतेने विचार व्हावा**

जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व इतर तत्सम संस्था, या विषमतेच्या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करीत नाहीत, हे खेदकारक आहे. जागतिक बँकेच्या अहवालात तर, 'वाढत्या विषमतेकडे नकारात्मक दृष्टिकोणातून बघण्यात येऊ नये' असे म्हणण्यात आले आहे. या जागतिक संस्थाही 'जागतिक' विचार करीत नाहीत, असे यावरून दिसते.

आता प्रश्न असा निर्माण होतो की जागतिकीकरणाचे तोटे जर विकसनशील राष्ट्रांना जास्त प्रमाणात भोगावे लागतील, असे म्हटले जाते, तर मग ही राष्ट्रे आपली अर्थव्यवस्था खुली करण्याचे धोरण का राबवीत आहेत ? या प्रश्नाचे उत्तर असे देता येईल की, विकसनशील देशांतील राज्यकर्त्यांनाही विषमता वाढतेय, याचे पुरेसे भान नसावे किंवा ही राष्ट्रेही विषमतेपेक्षा गरिबीच्या प्रश्नाला जास्त महत्त्व देत असावीत. विषमता व गरिबी यांच्यातील संबंध ते लक्षात घेत नसावेत. त्यामुळे गरिबी दूर करण्यासाठी उत्पन्नाची, देशांतर्गत नैसर्गिक संसाधनांची, मालमत्तेची समान विभागणी हे एक साधन ठरू शकते, याकडे त्यांचे दुर्लक्ष होताना दिसते. उत्पन्नाची विभागणी व जागतिक विषमता याविषयीचा हा एक दृष्टिकोण आहे.

या विषयाची दुसरी बाजू अशी की, मुळात जागतिक विषमता वाढतेय या विधानाशीच काही व्यक्ती सहमत नाहीत. किंवा उत्पन्नामधील असमानता दूर करण्यापेक्षा कोणत्याही देशाचा व तेथील नागरिकांचा आर्थिक विकास करण्याला प्राधान्य द्यावे, असे या गटाचे मत आहे. किंबहुना त्यांच्या मते हेच

प्रयत्न सध्या जागतिक पातळीवर चालू आहेत. समजा गेल्या काही वर्षांत विषमता वाढल्याचे आढळले तरी, त्याचा एवढा गंभीरतेने विचार करण्याची गरज नाही कारण, या निष्कर्षाप्रत येण्यासाठीचा हा कालावधी फार थोडा आहे, असे या गटाचे म्हणणे आहे. शिवाय समजा समाजात विषमता असली तरी श्रीमंतांना खाली ओढण्यापेक्षा गरिबांना वर आणण्याचा मार्ग ही मंडळी सुचवितात.

**जबाबदार घटकांनी विषमता दूर करण्याची गरज**

विषमता व त्याला दिलेल्या परिस्थितीत किती महत्त्व द्यावे याबाबत जागतिक पातळीवर मतभेद असले तरी जगात विषमता आहे, ही वस्तुस्थिती आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विषमता वाढू नये उलट असलेली विषमता दूर व्हावी असे अपेक्षित असेल तर, त्यासाठी सर्वच संबंधित घटकांनी एकत्र येऊन तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. विषमता ही जागतिक व दूरगामी परिणाम करणारी बाब आहे. जर विषमता सतत वाढतच गेली तर त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक धोक्याचा विचार वेळीच केला पाहिजे. जागतिकीकरणाच्या विरोधातील निदर्शने हा इशारा देतात. परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधीच उपाय करणे महत्त्वाचे आहे. ■■

*(संदर्भ -'द इकॉनॉमिस्ट' २८ एप्रिल २००१ मधील रॉबर्ट वॅड -प्रोफेसर, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स यांचा विशेष लेख )*

> जागतिकीकरणाचे फायदे-तोटे सर्व राष्ट्रांसाठी समान असतीलच असे नाही. विकसनशील राष्ट्रांच्या गटात, औद्योगिकरणाचा व विकासाचा भक्कम पाया घातलेल्या राष्ट्रांनाच जागतिकीकरणाचे फायदे काही प्रमाणात तरी मिळविता येणार आहेत. जागतिकीकरणाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी काही मूलभूत तत्त्वांचा विचार व्हायला हवा. समानता व सर्वांना समान संधी ही ती दोन तत्त्वे असून, या दोन तत्त्वांच्या पूर्तीसाठी काही धोरणात्मक बदल करावे लागले, तर तेही करण्याची तयारी हवी. उत्पन्नाचे फेरवाटप करून समानता प्रस्थापित करता येईल का ? याचा विचार करण्याची गरज आहे. व्यापारी शक्तींद्वारे आर्थिक वाढ होत असतानाच विषमताही वाढत असते, त्यामुळे आदर्शाचा विचार करताना उत्पादन, रोजगाराच्या संधी, संसाधनांवर समान अधिकार या सर्वांचा सर्वंकष, पण एकत्रित विचार उपयुक्त ठरू शकेल. *(संदर्भ -'अंडरस्टँडिंग डेव्हलपमेंट', लेखक - इग्नॅसी सॅक्स )*

इतिहास

# महात्मा गांधी व नोबेल पारितोषिक

गेल्या शतकातील महान नेता म्हणून महात्मा गांधींचा जो गौरव झाला तो त्यांच्या कार्याइतकाच त्यांच्या महान तत्त्वांसाठी. सत्य, अहिंसा, शांतता यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. हिंदुस्थानच्या फाळणीच्या वेळी झालेल्या उद्रेकात, हिंदु व मुसलमान यांच्यात ऐक्य घडवून आणून शांतता प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची जागतिक स्तरावर दखल घेतली गेली. हिंदुस्थानचे शेवटचे व्हाइसराय लॉर्ड माउंटबॅटन यांनी २६ ऑगस्ट १९४७ला, म्हणजे भारतीय स्वातंत्र्यानंतर केवळ दहाच दिवसांनी, त्यावेळी कलकत्त्यात असलेल्या गांधीजींना जी तार पाठविली त्यात म्हटले होते, "प्रिय गांधीजी, इकडे पंजाबमध्ये आमच्या हाताशी पंचावन्न हजार सैनिक आहेत आणि तरीही दंगली चालूच आहेत. तिकडे बंगालमध्ये मात्र आमचा 'एकच सैनिक' आहे आणि तिथे शांतता प्रस्थापित झाली आहे. एक जबाबदार अधिकारी आणि शासनकर्ता म्हणून या 'एक व्यक्ती सीमा सैनिकास ' मी प्रणाम करू इच्छितो." त्यांनी कलकत्त्यामध्ये केलेले उपोषण शांतता निर्माण करूनच संपले.

ई. डब्ल्यू. आर. लुंबी यांच्या 'द ट्रान्स्फर ऑफ पॉवर इन इंडिया - १९४५ - १९४७' या ग्रंथात म्हटले आहे, "त्यांचा (गांधीजींचा) विजय पूर्णपणे झाला; त्यांनी निर्माण केलेली शांतता चिरस्थायी होईल अशी आशा आहे. मुस्लीम लीगच्या वृत्तपत्रातही, कलकत्त्यातील मुस्लिमांनी गांधीजींचे ऋण मान्य करून म्हटले की, 'इतरांनी शांततेने आयुष्य घालवावे यासाठी ते मृत्यूला कवटाळायलाही तयार होते.' त्यांनी केलली जादू - तिला आधुनिक जगाच्या इतिहासात तोड नाही,"

गांधी विचारांवरील एक तज्ज्ञ आणि सध्याचे टोक्यो, जपानमध्ये स्थायिक असलेले विवेक पिंटो यांनी 'हिंदू'मधील आपल्या लेखात म्हटले आहे, "शस्त्रास्त्रांशिवाय आणि आपले विशाल हृदय व मुक्त प्रेम यांच्या सहाय्याने शांतता प्रस्थापित करणारा सैनिक कोणता असेल तर तो म्हणजे गांधीजी." गांधीजी जी शांतता निर्माण करू पाहात होते ती स्मशानशांतता नव्हती तर ती हृदये एकत्र आणणारी शांतता होती," असे गांधीजींचे चरित्रकर्ते बी. आर. नंदा यांनी म्हटले आहे.

गांधीजींची अहिंसा आणि त्यांनी केलेले शांततेचे प्रयत्न हे जगात अजोड असे होते, हे सर्वमान्य आहे. पण जागतिक शांततेचे नोबेल पारितोषिक देणारी, ओस्लोमधील 'नॉर्वेजियन नोबेल इन्स्टिट्यूट' चे याविषयी काय म्हणणे होते ? अलीकडेच या संस्थेने आपल्या गुप्त कागदपत्रावरील गेली पन्नास वर्षे असलेली बंधने सैल केली. आता ही कागदपत्रे उपलब्ध झाल्यामुळे गांधीजींना, शांततेचे नोबेल पारितोषिक मिळावे असा प्रयत्न निदान पाचवेळा तरी झाला; पण ते दिले मात्र कधीच नाही; याची माहिती मिळाली आहे.

नोबेल शांतता पारितोषिकासाठी गांधीजींचे नाव १९३७, १९३८, १९३९, १९४७ आणि १९४८साली, असे पाच वेळी विचारात घेतले गेले होते. त्यातही १९३७,१९४७ आणि १९४८साली तर ते मोजक्या नावांच्या सूचीत होते. नोबेल ई-म्युझियमचे पीस एडिटर टनेसन यांनी कागदपत्रांचा अभ्यास करून गांधीजींना नोबेल पारितोषिक नाकारले गेले याची तीन कारणे सांगितली आहेत. ती म्हणजे योग्यता आणि मरणोत्तर पारतोषिक न देण्याचा संकेत; व तसा पूर्वेतिहास नसणे.

अल्फ्रेड नोबेल (१८३३-१८९६) हा डायनामाईटचा निर्माता. स्वतः स्विडिश. त्याने 'नोबेल शांतता पुरस्कार कुणाला दिला जावा, याविषयी लिहून ठेवले आहे ते असे; " वेगवेगळया राष्ट्रांमध्ये बंधुभाव निर्माण व्हावा यासाठी जो आयुष्य वेचतो आणि महान कामगिरी करतो, त्याला हा शांतता पुरस्कार प्रदान केला जावा, " अर्थात हे ठरविताना, 'कोणत्याही प्रकारे राष्ट्रीयत्व विचारात घेतले जाऊ नये. केवळ त्याची योग्यता विचारात घ्यावी, ' असेही आपल्या इच्छापत्रात नोबेल यांनी नमूद करून ठेवले आहे. 'योग्यतेच्या निकषावर पाहता, गांधीजींनी हिंदु-मुस्लिम अशा दोन्ही जमातींमध्ये सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न जिवाचे मोल पणाला लावून केला आहे. देशाच्या फाळणीच्या वेळी दोन नव्याने निर्माण झालेल्या राष्ट्रांमध्ये केलेले त्यांचे हिंदु-मुस्लिम या दोन जमातींत सामंजस्य घडवून आणण्याचे प्रयत्न प्रामाणिक आणि तेवढेच थोर होते. तरीही त्यांची योग्यता नाकारली गेली. नोबेल शांतता पुरस्कार देणारी जी 'नॉर्वेजियन नोबेल कमिटी' आहे तिचा निदान १९३६ पर्यंत तरी केवळ उत्तरेकडील राष्ट्रांकडेच कल होता. ही समिती वसाहतवादी दृष्टीची होती, असेही म्हटले जाते. तसेच 'शांतता' याविषयीची तिची कल्पनाही मर्यादित होती.

दुसरे असे की, गांधीजींची अहिंसक चळवळ, धर्माच्या आधारे होणाऱ्या फाळणीला गांधीजींनी केलेला विरोध यांपेक्षासुद्धा ब्रिटिश नि अमेरिकन वृत्तपत्रांतून गांधी-विरोधी होणारा प्रचारच, नोबेल समितीच्या मनावर अधिक

ठसला असावा. महायुद्ध कालातील ब्रिटिश नेतृत्व तर, गांधीजींनी उभारलेल्या १९४२ सालच्या 'भारत छोडो' आंदोलनामुळे, उघडपणेच गांधीजींच्या विरोधात होते; कारण हे आंदोलन जरी प्रत्यक्षपणे ब्रिटिश सत्तेविरुद्ध छेडले गेले होते तरी ते होते प्रामुख्याने 'परकीय सत्ते'च्या विरोधात. ब्रिटन-अमेरिका यांना बोचणारी अशीच ही भूमिका होती. युद्धातील दोस्त राष्ट्रांच्या बाजूने असणाऱ्या नॉर्वेजियन नोबेल कमिटीलाही त्यामुळे गांधीजी रूचले नसावेत. नोबेल पारितोषिक देण्यायोग्य वाटले नसावेत.

१९४८ साली गांधीजींचे नाव मोजक्या नावांच्या सूचीत होते. गांधीजींची हत्त्या ३० जानेवारी १९४८ ला झाली. परंतु त्यापूर्वीच म्हणजे गांधीजी जिवंत असतानाच त्यांचे नाव नोबेल पारितोषिक निश्चितीच्या जवळपास आले होते. परंतु ते नाकारण्यात आले. गांधीजींच्या मृत्यूनंतर ते जाहीर करण्यात आले असते तर पारितोषिकाची रक्कम कोणास द्यावी असाही प्रश्न कदाचित नॉर्वेजियन कमिटीला पडला असावा. पण तोवर अनेक सामाजिक संस्थांना हा पुरस्कार दिला गेलाच होता. तसा तो गांधीजींनी स्थापन केलेल्या आणि कृतिशील असलेल्या संस्थांनाही देता आला असता.

गांधीजींनी चार संस्था स्थापन केलेल्या होत्या. १९२३ सालची गांधी सेवा संघ, १९३३ सालची हरिजन सेवा संघ, १९३४ सालची अखिल भारतीय ग्रामोद्योग संस्था आणि १९३७ सालचा तालिमी संघ. १९४८ सालापर्यंत या संस्था व त्यांचे कार्य चांगलेच नावारूपाला आले होते. पण, गांधीजींचे नाव नोबेल शांतता पुरस्कारातून अखेरीस कायमचेच वगळले गेले ! का ? हा प्रश्न मात्र कायम ठेवून !! ■■

*(संदर्भ - व्ही. गंगाधर यांचा 'द हिंदू' मधील लेख)*

"मी 'महात्मा' म्हटलो गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. 'महात्मा' कोण हे आपल्याला माहीत नाही. म्हणून चांगला मार्ग हा की 'महात्म्या'चे वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा."

"कोणाला माझ्या दोन वचनात विरोध भासल्यास त्याने, माझ्या शहाणपणावर त्याचा विश्वास असेल तर, एकाच विषयावरील त्या दोन वचनांपैकी मागाहूनचे वचन प्रमाण मानावे."

*(महात्मा गांधी. गांधीजींची विज्ञापना - ग्रामस्वराज्य)*

# छळांचे बळी

आपल्या समाजात लहान मुला-मुलींची, किशोरवयीन मुला-मुलींची परिस्थिती फारशी बरी नाही, त्यांच्यावर होणारे विविध तऱ्हेचे अन्याय, अत्याचार त्यांचे मानसिक आरोग्य बिघडविण्यास कारणीभूत ठरतात. पण, या गोष्टी ठळकपणे पुढे येत नाहीत. बऱ्याचदा पालकांचा कल घडलेल्या घटनांविरुद्ध संघर्ष करण्यापेक्षा, घटना लपविण्याकडे असतो. किंवा मुलेही अशा गोष्टींविषयी, लाजेने म्हणा किंवा भीतीने म्हणा, पालकांशी मोकळेपणाने बोलत नाहीत. शाळांमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधले नाते असे विश्वासाचे नसते की विद्यार्थ्यांनी शिक्षकांपुढे आपले मन उघडे करावे, आपल्या अडचणी आधाराच्या अपेक्षेने मांडाव्यात. पालक-विद्यार्थी-शिक्षक हा नात्याचा त्रिकोण परस्परांविषयीच्या विश्वासाने गडद झालेला, भरलेला नसतो. त्यामुळे या शैशवावस्थेत मुलांची मानसिक कोंडी होताना दिसते आहे. घरांनी, शाळांनी नि समाजाने गंभीरपणे याकडे लक्ष द्यावे असा हा विषय आहे.

उदाहरणादाखल, आपल्याला 'द टॉर्चर प्रिव्हेंशन सेंटर ऑफ इंडिया'ने अर्नाकुलमच्या शाळांमध्ये घेतलेल्या एका पाहणीकडे वळता येईल. वय वर्षे १२ ते १७ अशा किशोरवयीन मुला-मुलींची ही पाहणी केली गेली होती. या पाहणीचा ठळक निष्कर्ष असा आहे की, आपण सामान्यतः समजतो, तसे केवळ मुलीच नव्हे तर मुलगेही समाजातील विविध तऱ्हेच्या लहान-मोठ्या छळांचे बळी असतात. याविषयी लीला मेनन यांचा 'द हिंदू'मध्ये एक लेख आहे.

शारीरिक, लैंगिक, भावनिक किंवा कोणत्याही प्रकारच्या क्रूर, अमानुष किंवा अपमानास्पद असा घरच्यांचा, शाळेतल्यांचा किंवा समाजात कुणाचाही तुम्हाला कधी अनुभव आला आहे का ? असा प्रश्न दहाहजार मुला-मुलींना विचारण्यात आला; आणि त्यांपैकी ४११९ मुलांनी याचे होकारार्थी उत्तर दिलेले आहे. ही घटना आपल्याला पुढील पिढीविषयी आणि त्यांच्यासंदर्भात आपल्याविषयी विचार करायला लावणारी आहे. एखाद्या सामान्य माणसाच्या ज्या तऱ्हेच्या वागणुकीमुळे शारीरिक, मानसिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, लैंगिक स्वरूपातील इजा पोहोचेल आणि स्वतःच्या व्यक्तिमत्वाला धक्का पोचेल, अशी वागणूक म्हणजे अमानुष, क्रूर वागणूक, अशी व्याख्याही या मुलांसमोर ठेवण्यात

आली होती. मुलांपैकी ४६ टक्के मुलांनी आणि मुलींपैकी ३८ टक्के मुलींनी अशा प्रकारचा अनुभव आपल्याला आल्याचे कबूल केले आहे.

**सामाजिक शोकांतिका**

अशातऱ्हेने विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी मुलींपेक्षा मुले अधिक मोकळेपणाने पुढे येतात, हा अनुभव सार्वत्रिक आहे. आपापल्या घरातच होणाऱ्या शारीरिक अथवा मानसिक छळाबाबतची आकडेवारी, आपल्या समाजातील कौटुंबिक वातावरणावर प्रकाश टाकणारी आहे. २४ टक्के मुलांनी आणि १४ टक्के मुलींनी त्यांना घरात मार खावा लागतो, असे सांगितले तर आपला मानसिक छळ केला जातो, असे सांगणाऱ्या मुलांचे प्रमाण ४२ टक्के तर मुलींचे प्रमाण ५४ टक्के आहे, असे या पाहणीत आढळून आले.

शाळांमध्ये फारसे वेगळे चित्र आहे असे नाही. ३६ टक्के मुलांनी आणि ९ टक्के मुलींनी शाळेत शारीरिक शिक्षा होतात किंवा मार खावा लागल्याचे सांगितले. अधिक गंभीर बाब आहे ती मानसिक छळाबाबतची. एक्केचाळीस टक्के मुले आणि सदुसष्ट टक्के मुली शाळांमधून मानसिक छळांचे बळी ठरले आहेत. याहूनही गंभीर बाब पुढेच आहे. शिक्षक, ग्रंथपाल वगैरेंकडून लैंगिक अत्याचाराची कबुली सहा टक्के मुलांनी नि पाच टक्के मुलींनी दिली आहे. 'आम्हाला असे कबूल करण्याची फार भीती वाटते,' असे त्यांचे म्हणणे आहे. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या शारीरिक, मानसिक, लैंगिक अत्याचारांबाबतही मुलांनी मौन सोडले. पाहणीत असे आढळले की ११५१ मुलींनी व ७१४ मुलांनी आपल्याबाबतीत अशा घटना घडल्याचे सांगितले आहे. २७ टक्के मुलांना नि १६ टक्के मुलींना, सार्वजनिक ठिकाणी शारीरिक त्रास सहन करावा लागला आहे. मानसिक त्रासाबाबतचे हे प्रमाण मुलांबाबत व मुलींबाबत अनुक्रमे ३४ टक्के व ४४ टक्के असे आहे. तर लैंगिक त्रासाबाबत १० टक्के मुलींनी तक्रार केली आहे.

अशा अडचणींच्या वेळी मुलांच्या मदतीला त्यांची घरे किंवा शाळा येत नाहीत, ही खरी सामाजिक शोकांतिका आहे. अशावेळी केवळ आपल्या बरोबरीच्या मित्र-मैत्रिणींवरच अवलंबून राहावे लागते अशी या मुलांची खंत आहे. श्रीमंत व गरीब असाही भेद येथे नाही. तथाकथित स्पर्धात्मक आयुष्यासाठी मुलांच्या अभ्यासाची तयारी करून घेण्यात पालकांची स्पर्धा लागते; पण बालवयात आणि शैशवात मुलांचे भावनिक नि सामाजिक आयुष्य विस्कळित होतेय् याकडे पालकांचे दुर्लक्ष होतेय्, असे वाटते. ■■

# बालकांच्या हक्कांबाबत कोड बील

बालकांना स्वत:चे हक्क आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने सप्टेंबर १९९० मध्ये 'बालकांच्या हक्का'ची सनद तयार झाली आहे. ती स्वीकारल्याची आणि अंमलात आणण्याची हमी देणाऱ्या राष्ट्रांपैकी भारत हे एक राष्ट्र आहे. भारताने डिसेंबर १९९२ मध्ये तिला मान्यता दिली आहे. परंतु बालकाच्या हक्कांविषयी पुसटशीसुद्धा जाणीव निर्माण झाल्याचे दिसत नाही. बालकांना त्याची कल्पना दिली जात नाही आणि इतर समाज बालहिताविषयी आणि बालहक्काविषयी फारसा उत्सुक नाही नि जागरूकही नाही. भारतीय राज्यघटनेने बालकाच्या संरक्षणाची, विकासाची तरतूद केली आहे; घटनेच्या ३९ व्या कलमाने असे आश्वासन दिले आहे की, "मुलांना शिवीगाळ केली जाणार नाही; त्यांचे बाल्य व शैशव यांचा शोषणापासून बचाव केला जाईल; त्यांची नैतिक नि भौतिक शक्ती हिरावून घेतली जाणार नाही." त्यानंतर २२ ऑगस्ट १९७४ ला केंद्र सरकारने 'बालकांबाबतचे राष्ट्रीय धोरण'ही स्वीकारले. पण या गोष्टी फारशा गांभिर्याने व्यवहारात उतरवल्या गेल्या नाहीत. सप्टेंबर १९९५ मध्ये झालेल्या बीजिंग येथील महिलांविषयक जागतिक परिषदेने व तिचा पाठपुरावा करणाऱ्या न्यूयॉर्क परिषदेने मुलींबाबतचा लिंगभेदाचा मुद्दा उचलून धरला आणि आग्रहाने असे प्रतिपादन केले की, आंतरराष्ट्रीय पातळीवरील बालकांच्या हक्काची सनद व्यवहारात उतरविण्याच्या दिशेने त्वरेने पावले टाकली गेली पाहिजेत.

यासाठी केंद्र सरकारने जस्टिस व्ही. आर. कृष्णा अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली एक खास तज्ज्ञ समिती नेमून 'द चिल्ड्रेन्स कोड बील, 2000' तयार केले आहे. लवकरच ते संसदेपुढे ठेवले जाईल. भारतातील आज सुमारे ४० कोटी मुलांना घटनेने दिलेला 'जगण्याचा, वाढीचा, विकासाचा नि संरक्षणाचा' हक्क या कायद्याने सुरक्षित राहील, असा प्रयत्न अतिशय बिस्तारपूर्वक तरतुदींनी या कायदा विधेयकात करण्यात आला आहे. मुलांचे विविध अत्याचारापासून संरक्षण व्हावे यासाठी समान कायद्याची तरतूद येथे केली आहे. या विधेयकात १५ विभागात ११७ कलमे असून, ते जम्मू-काश्मीरसह संपूर्ण राष्ट्राला लागू केले जाईल.

'बालका'ची व्याख्या ठरविण्यासाठी समान वयोमर्यादा प्रथमतःच ठरविण्यात आली आहे. वयाच्या १८ वर्षापर्यंतचे वय हे 'बाल्यावस्थेचे वय' आता सर्व संदर्भात मानले जाईल. आपल्या देशातील मुलींची खास परिस्थिती विचारात घेऊन, येथे, स्वतंत्र प्रकरणात त्याची दखल घेतली आहे. केंद्र व राज्यांच्या पातळीवर 'बालक आयोग' निर्माण करण्याची महत्त्वाची तरतूद या विधेयकात आहे; एवढेच नव्हे तर, या आयोगांच्या खर्चासाठी खास उपकर बसवून 'निधी'ची सोय करता येईल, अशीही तरतूद आहे. राज्यांनी, आपल्या अखत्यारीत, सक्तीचे निःशुल्क प्राथमिक शिक्षण द्यावे, प्राथमिक आरोग्याच्या सोयी उपलब्ध कराव्यात आणि सर्व प्रकारच्या अन्यायांपासून व शोषणापासून बालकांना मुक्त करावे, अशी जबाबदारी त्याच्यावर देण्यात आली आहे. १४ वर्षाखालील मुलाला कामावर न नेमण्याची आणि १८ वर्षाखालील मुलाला धोक्याच्या उद्योगात न नेमण्याची तरतूदही या विधेयकात आहे.

बालकांवर होणाऱ्या विविध अत्याचारांची दखल घेण्यासाठी पोलिसखात्यात खास कक्ष निर्माण केला जाईल आणि मुलींसंदर्भातील घटना हाताळण्यासाठी महिला पोलीस अधिकारी, महिला पोलीस, महिला वैद्यकीय तपासनीस यांची सोय केली जाणार आहे. बालकांच्या हक्कावर अतिक्रमण करणाऱ्यांना कडक शिक्षेची तरतूदही या विधेयकात केली आहे.

विधेयक संसदेपुढे ठेवले जाईल, त्याचे कायद्यात रूपांतर होईल, कायद्यातील तरतुदींनुसार, यथावकास, व्यवस्थाही अंमलात येतील. त्यांचा लाभ घेण्याची प्रवृत्ती निर्माण होणे, त्यासाठी या कायद्याची माहिती देशाच्या कानाकोपऱ्यात पसरणे आणि अखेरीस बालकांनाही आपल्या हक्काची योग्य वेळी योग्य तऱ्हेने माहिती होणे यावर बालकांची छळापासून काही प्रमाणात तरी मुक्तता होणे अवलंबून आहे. ■■

*(संदर्भ - द चिल्ड्रेन्स कोड बील २०००')*

"माझ्या लाडक्या मुलांनो, मला तुमच्या डोळ्यात चमक दिसतेय, तुमच्या शरीरातील चैतन्य दिसतेय आणि तुमच्या मनातील आशा दिसतेय. मला माहिती आहे, या जगाचे भविष्य तुम्ही घडविणार आहात, मी नाही. आमच्या चुका तुम्हा दुरूस्त करणार आहात, व जगातल्या चांगल्या गोष्टींना तुम्हीच पुढे घेऊन जाणार आहात, मी नाही."

- नेल्सन मंडेला, भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष, दक्षिण आफ्रिका,

(युनिसेफचा अहवाल - 'जगातील मुलांची स्थिती २००१' मधून )

# जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती धोकादायक ?

*(अलीकडे जैवतंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीमुळे जैवतंत्रज्ञानयुक्त बियाणे भारतात शेतीक्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासनानेही शेतीसंबंधीच्या वेगवेगळ्या क्षेत्रात जैवतंत्रज्ञानयुक्त बियाण्यांच्या वापरासाठी प्रायोगिक तत्त्वावर प्रोत्साहन दिले आहे. एकीकडे या दिशेने विकासाची पावले पडत असतानाच दुसरीकडे मात्र काही शास्त्रज्ञ, शेतीतज्ज्ञ व पर्यावरणवादी यांच्याकडून या नवीन तंत्रज्ञानाला विरोधही होत आहे. या नवतंत्राचे सामर्थ्य व उपयुक्तता लक्षात यावी, तसेच जैवतंत्रज्ञानयुक्त वस्तूंच्या वापरात काही धोके आहेत काय तेही कळावे; शेती व पर्यावरण यांवर या तंत्रज्ञानाचे होणारे साधक-बाधक परिणाम समजावेत यासाठी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने, 'जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती निसर्गाला व मानवाला तारक की मारक ?' या विषयावर नुकतेच एका गटचर्चेचे आयोजन केले होते. विषयाच्या सर्व बाजू स्पष्ट व्हाव्यात यासाठी तीन वक्त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. अंजली कुळकर्णी (जैवतंत्रज्ञानसंशोधक) यांनी 'वनस्पती व जैवतंत्रज्ञान', डॉ. पी.के. चिटणीस (प्रा. एस. पी. कॉलेज ) यांनी 'जैवअभियांत्रिकी' आणि श्री. अंकूर पटवर्धन (परिसरविज्ञान अभ्यासक,रानवा)' यांनी 'परिसरविज्ञान व जैवतंत्रज्ञान' या विषयांवर आपली मते मांडली. त्यानंतर उपस्थितांमध्ये यावर चर्चा झाली. यावेळी संस्थेतर्फे, तज्ज्ञांच्या मदतीने एक अभ्यासपूर्ण टिपण तयार करण्यात आले होते. ते येथे प्रसिद्ध करीत आहोत. यासंबंधी वाचकांना अधिक माहिती हवी असल्यास वा द्यायची असल्यास, ते पत्ररूपी चर्चेत सहभागी होऊ शकतात.)*

**जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती म्हणजे काय ?**

एखाद्या रोपातील विशिष्ट गुणधर्म दुसऱ्या रोपात असावे यासाठी जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने मूळ रोपातील जनुकात बदल करण्यात येतात. यातून जे नवे रोप तयार होते, त्याला जैवतंत्रज्ञानयुक्त वनस्पती असे म्हणण्यात येते. उदाहरणार्थ - गाजरातील 'व्हिटामिन ए' हे तांदुळाच्या रोपात घालणे, यामुळे गाजराशिवाय भातातूनही व्हिटामिन ए मिळू शकते. असाच प्रकार टोमॅटो व गाजराच्या रोपांत करण्यात येऊ शकेल, म्हणजे गाजरातील

व्हिटामिन ए आता टोमॅटोमधूनही मिळेल. सोयाबीन व मका यांच्या रोपातही असे जनुकीय बदल करण्यात आले आहेत. अमेरिकेतील सोयाबीन व मका यांच्या एकूण उत्पादनापैकी किमान ५० टक्के उत्पादन हे जनुकीय बदल केल्यानंतर ग्राहकांपर्यंत पोचते असे म्हटले जाते. प्राण्यांच्या बाबतीतही असे प्रयोग करण्यात येत आहेत. कोंबड्यांना व माशांना काही विशिष्ट इंजक्शने देऊनही हे बदल घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे केवळ कोंबडीच नव्हे तर चिकन व अंडी यांच्यात हे जनुकीय बदल आढळतील, व त्यांचे परिणाम मानवावर व अन्नसाखळीवर होऊ शकतील, असे हे प्रयोग आहेत. संपूर्ण जगात सध्या असे जैवतंत्रज्ञानयुक्त बदल करण्यावरून वादंग होत आहेत. युरोप व आशियातील काही राष्ट्रांनी तर या प्रकाराला विरोध करून त्यावर बंदी घातली आहे. तर अमेरिकेतील नागरिकांनी याला बऱ्याच प्रमाणात विरोध केला आहे. भारतात आता हा विषय चर्चेत येतो आहे.

**टिपणातील समर्थनाचे मुद्दे**

१) जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केलेल्या रोपांमुळे शेतीतील उत्पन्न वाढते. २) असे तंत्र वापरल्याने विविध प्रकारची विषाणूरहित (virus free) रोपे तयार करता येतात. ३) अशी रोपे नैसर्गिक ताण किंवा प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकतात, म्हणजे दुष्काळी परिस्थितीत किंवा जमीन नापीक झाल्यावरही टिकून राहू शकतात. ४) रोप लहान असतानाच रोपांमधे कोणते विशिष्ट गुणधर्म असावेत, याची निवड करणे सोपे जाते. ५) अशा वनस्पती किंवा झाडे यांना फुले व फळे लवकर येऊ शकतात. ६) पेशींमधून वेगवेगळ्या चवी, सुवास, औषधे व रंग यांची निर्मिती करता येते. ७) निसर्गचक्रात उपलब्ध नसलेल्या अनेक संकरित जाती मानवाला मिळू शकतात. ८) बाह्यरूपाने दिसण्यास एकसारखी व तेच विशिष्ट गुणधर्म असणारी रोपे तयार करता येतात. ९) निसर्गचक्रात नष्ट होत जाणाऱ्या वनस्पतींचे संरक्षण करता येते. १०) कीड व कीटक यांच्यापासून वनस्पतींना कोणताही अपाय होऊ नये, यासाठी जैवअभियांत्रिकीचा वापर करून रोपे तयार करण्यात येतात. यामुळे कीटकनाशकांचा वापर कमी प्रमाणात करावा लागतो. ११) रंग, गंध आणि चव हे रोपांचे गुणधर्म बदलता येतात. १२) जैवअभियांत्रिकी व परंपरागत पद्धत यांचा समन्वय साधून वनस्पतींची परिणामकारक वाढ कमी वेळात करता येते. १३) एखाद्या पिकांत, वनस्पतींमध्ये नैसर्गिक नसलेली पण आरोग्याला आवश्यक

असणारी पोषणमुल्ये या तंत्रज्ञानाने त्यात घालता येतात. त्यामुळे सर्वसामान्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. १४) लसीकरणासाठी व अतिरिक्त व्हिटामिन्सचा पुरवठा करण्यासाठी अशा रोपांचा वापर करण्यात येऊ शकतो. १५) तेलबियांमधील मेदाम्लांचे (fatty acids) प्रमाण यामुळे बदलता येऊ शकेल, ती अधिक आरोग्यवर्धक करता येतील. १६) ग्राहकांच्या मागणीप्रमाणे त्यांना हवी ती चव, रंग व गंध यांचा मिलाफ साधता येईल. १७) सीझन नसताना देखील विविध फळे व भाज्या यांचा आस्वाद घेता येईल. १८) अनेक देशांमधील खाण्याची विविधता चाखता येईल. १९) आरोग्याला उपयुक्त अशा घटकांचा यात समावेश असल्याने औषधांवरील खर्च वाचू शकेल.

## टिपणातील विरोधाचे मुद्दे

१) जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केलेल्या नवीन रोपांमुळे शेतीतील उत्पन्न जास्त मिळू शकते. त्यामुळे कमी उत्पन्न देणाऱ्या जातींची लागवड करण्यात येत नाही. अशा स्थानिक व परंपरागत जाती नष्ट होण्याची शक्यता.२) अनेकदा अनैसर्गिक गुणधर्म एखाद्या वनस्पतीत घालताना त्यातील नैसर्गिक गुणधर्म नष्ट होण्याची शक्यता.३) ज्या झाडांची पाने औषधे किंवा इतर व्यापारी कारणासाठी वापरण्यात येतात तिथे फुले व फळे लवकर येणे तोट्याचे ठरू शकते. ४) प्रत्येक पिकाचे, फुलाफळांचे आपले असे एक नैसर्गिक वैशिष्ट्य असते. ते नैसर्गिक असते म्हणून त्याचे महत्त्व असते व ते मानवी आरोग्याला फायदेशीर ठरत असते. ही नैसर्गिकता घालविली तर नव्याने तयार होणारे उत्पादनातून ते सर्व फायदे मिळतीलच असे नाही. ५) अशा संकरित जातींचा परिसरातील इतर वनस्पतींवर काय परिणाम होऊ शकतो याचा अभ्यास करण्यात आलेला नाही. तसेच अनैसर्गिकतेमुळे जमिनीचा कस संपण्याची शक्यता आहे असे म्हटले जाते. ६) नैसर्गिक विविधता नष्ट होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढल्याने नैसर्गिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जाते. ७) जैवअभियांत्रिकीचा वापर करून तयार करण्यात आलेल्या रोपांमधील जनुके परागकणांबरोबर इतर झाडांमध्ये पसरू शकतात व त्यामुळे तणांची संख्या वाढू शकते. तणांचे आव्हान पेलण्यासाठी निसर्गतः असलेली प्रतिकारशक्तीच आवश्यक असून ती प्रतिकूल परिस्थितीत तग धरण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असते. अशी रोपे हे आव्हान पेलू शकत नाहीत. ८)जैवअभियांत्रिकीच्या मदतीने तयार करण्यात आलेली रोपे नैसर्गिकरीत्या वाढणाऱ्या तणांसमोर तग धरू शकत नाहीत. ९) नैसर्गिक चव व

रंग बदलल्याने त्या विशिष्ट झाडांवर अवलंबून असणारे परोपकारी कीटक व जीवाणू नष्ट होण्याची शक्यता. व यामुळे नैसर्गिक समतोल ढासळून परिसरविज्ञानात (ecology) व्यत्यय येऊ शकतो. तसेच निसर्गचक्र बदलण्याच्या शक्यतेतून मानवी आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. १०) नव्या जनुकांमुळे अन्नसाखळीतून नको ते दोष पसरण्याची भीती आहे. ११) एखादे असे विशिष्ट पीक संपूर्ण चौरस आहाराची जागा घेऊ शकत नाही. सरसकट सर्वच पिकांमध्ये व्हिटामिन्स किंवा तत्सम काही घटक घातले तर ही अतिरिक्त पोषणमूल्ये काहींना घातक ठरू शकतील. १२) वनस्पतींमधील काही नैसर्गिक घटक नष्ट होण्याची शक्यता आहे. १३) वेगवेगळी इंजेक्शन्स व इतर वाढीची औषधे देऊन वाढविलेल्या वनस्पती व प्राण्यांच्या सेवनाने मानवी आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. १४) नैसर्गिक चव, रस व गंध यांचा एरवी शरीराला होणारा उपयोग होणार नाही. उदा - लिंबू हे आंबट असून ते त्यातील व्हिटामिन सी मुळे आरोग्याला उपयुक्त आहे. पण ते जैवतंत्रज्ञान वापरून जर गोड केले तर त्यातील व्हिटामिन सी नष्ट होऊ शकेल ? १५) आंबा हे फळ जर उन्हाळ्यात शरीराला आरोग्यदायी ठरत असेल तर ते थंडीत उपयुक्त ठरेलच असे नाही. किंबहुना त्याचे वाईट परिणाम देखील होऊ शकतील. १६) ज्या मातीत जे पिकते ते खाणे तेथील नागरिकांच्या आरोग्याला मानवते. आफ्रिकेतील किंवा ऑस्ट्रेलियातील भाज्या व फळे भारतातील हवामानात मानवतील असे नाही. १७) जैवतंत्रज्ञानाविषयी समाजात अजून फारशी माहिती नाही. वैज्ञानिक दृष्टिकोणातून सविस्तर माहिती लोकांपर्यंत पोचण्यास हवी. १८) जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या अशा बिया, रोपे, वनस्पती व खाद्यपदार्थ आणि अशा नैसर्गिक गोष्टी यातील फरक ग्राहकांना कळू शकत नाही. त्यामुळे अशा उत्पादनांवर तसा उल्लेख ( लेबल ) असणे हे महत्त्वाचे आहे. काही देशांमधे यासंबंधीचा कायदा करण्यात आला आहे. भारतात यासंबंधीचा कायदा नाही. १९) अतिरिक्त प्रोटीन्स व तत्सम काही घटकांमुळे ॲलर्जी व इतर काही आजारांचे प्रमाण वाढण्याचा धोका आहे. २०) जैवअभियांत्रिकीमध्ये 'ॲंटीबायोटिक मार्कर' वापरले जातात. ही जनुके जर जीवाणूंमध्ये पसरली तर जीवाणूंची प्रतिकारशक्ती वाढेल. त्यामुळे आतापर्यंत त्या जीवाणूंसाठी वापरण्यात येणाऱ्या औषधांचा त्या जीवाणूंवर परिणाम होणार नाही. २५) एकंदरीत नैसर्गिक विविधता व निसर्गाची साखळी नष्ट होण्याची शक्यता आहे. ■■

*(संदर्भ - आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक नियतकालिके व इंटरनेवरील माहिती)*

# मातृत्वाचे अर्थशास्त्र

'आईपणा'चा आणि अर्थशास्त्राचा अर्थाअर्थी संबंध नाही असे आपण समजून चालतो. पण आजच्या या व्यापारी जगतात जिथे 'अर्था'लाच महत्त्व मिळते आहे, तिथे आईपणाचा नि अर्थशास्त्राचा जवळचा संबंध आहे. हा संबंध उलगडून दाखविला आहे ॲन क्रिटेंडन या लेखिकेने. अलीकडेच त्यांचे 'इकॉनॉमिक्स ऑफ मदरहूड' असे एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. यातील आईपणाचे चित्र अमेरिकेतील असले तरी जगातील बहुतेक देशांमध्ये आईपणाच्या कळा थोड्याफार फरकाने सारख्याच असाव्यात !

अमेरिकेतील अनेक सुशिक्षित स्त्रिया गेल्या काही वर्षांपासून 'आई ' होण्याचे नाकारत आहेत, कारण 'आई' झाल्यानंतर त्यांना नोकरीत यासंबंधीच्या कोणत्याही सोयी -सुविधा मिळत नाहीत. भरपगारी मातृत्वरजा मिळणे तर दूरच राहिले, उलट त्यांना बाळाच्या जन्मानंतर लगेचच कामावर रूजू व्हावे लागते. घरी एवढे तान्हे मूल असूनही आपण आपल्या कामाशी किती प्रामाणिक आहोत, हे त्यांना आटोकाट प्रयत्न करून सिद्ध करावे लागते. ऑफिसची शिफ्ट संपली की लगेचच घरची 'सेकंड शिफ्ट' करावी लागते. जर त्यांनी कमी त्रासाचे, कमी जबाबदारीचे काम मागितले तर त्यांच्याकडे कंटाळवाणे व कमी महत्त्वाचे काम सोपविण्यात येते. आणि बढतीच्या वेळी हा 'निगेटिव्ह' पॉईंट समजला जातो. मूल लहान असताना जर त्यांनी 'करियर' थोड्या कालावधीसाठी न करण्याचा विचार केला तर, पुन्हा नोकरी न मिळण्याचा धोका फारच मोठा असतो. कारण 'करियर'मध्ये हा 'ब्रेक'देखील वाईटच समजला जातो.

मूल वाढविण्यासाठी अमेरिकेतील स्त्रिया कुटुंबव्यवस्थेवर अवलंबून राहू शकत नाहीत, कारण तेथे घटस्फोटांचे प्रमाण फारच जास्त आहे. त्यामुळे नवऱ्यांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहणे त्यांना नको असते. अमेरिकेतील राहणीमान पाहता स्वत:च्या व मुलांच्या भवितव्यासाठी स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन हे फारच महत्त्वाचे ठरते. ॲन क्रिटेंडन यांनी या पुस्तकात अतिशयोक्ती केली असे म्हटले जाते, तरी 'आईपणाचे अर्थशास्त्र' हा महत्त्वाचा मुद्दा आहे हे नक्की ! युरोपमधील व इतरही काही देशांत एवढी वाईट परिस्थिती नाही, असे म्हणतात. ■■

## बटाट्याच्या व तंबाखूच्या रोपांमध्ये कोळयाची जनुके

जैवतंत्रज्ञानाने अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य होत आहेत. त्यातीलच 'नेचर बायोटेक्नॉलॉजी'च्या अंकात प्रसिद्ध झालेली ही एक घटना. 'गोल्डन ऑर्ब विव्हिंग स्पायडर' (नेफिला क्लॅविप्स ) हा एक प्रकारचा कोळी. त्याच्या शरीरात निसर्गाने दिलेला 'सिल्क प्रोटीन' नावाचा एक घटक असतो. या घटकाचा उपयोग करून हा कोळी एक विशिष्ट जाळे तयार करतो. हे जाळे स्टीलपेक्षाही मजबूत असते, पण त्यात खूप लवचिकताही असते. फार वेगाने उडणाऱ्या माशा या जाळयात चटकन अडकतात व या कोळ्याच्या पोटाचा प्रश्न सुटतो. निसर्गाची ही किमया लक्षात आल्यानंतर, या कोळ्यातील 'सिल्क प्रोटीन'चा उपयोग आपल्याला व्हावा असे मानवाला न वाटले तर नवलच ! येथे जैवतंत्रज्ञान त्याच्या मदतीला आले.

शास्त्रज्ञांनी जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने या कोळ्याच्या शरीरातील जनुके बटाट्याच्या व तंबाखूच्या झाडांमध्ये घातली. हेतू हा की, या झाडांच्या पेशींमध्ये हे 'सिल्क प्रोटीन' मोठ्या प्रमाणावर तयार व्हावे व ते मानवाला काढता यावे. याप्रमाणेच हे सिल्क मिळविण्यासाठी बकऱ्यांमध्येही जनुकीय बदल करण्यात आले आहेत. बकऱ्यांपासून मिळणाऱ्या दूधातून हे प्रोटीन मिळेल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. नैसर्गिकरीत्या तयार झालेले अशा प्रकारचे सिल्क मिळविणे हे अतिशय खर्चिक आहे. ड्यू पाँट या कंपनीतर्फे हे 'सिल्क' वापरून तयार करण्यात आलेल्या केव्हलर फायबरचा उपयोग 'बुलेट प्रुफ जाकिटे', विमानाचे काही भाग व खेळांतील काही विशिष्ट साधनसामग्री बनविण्यासाठी करण्यात येतो. हे सर्व खर्चिक आहे. हा खर्च कमी करण्यासाठी नैसर्गिक सिल्कचे गुणधर्म असणारे कृत्रिम सिल्क हा पर्याय ठरू शकतो, असा विचार पुढे आल्याने हा प्रयोग करण्यात आला आहे.

पण इथेच शास्त्रज्ञ अडचणीत सापडले आहेत. एकतर असा जनुकीय बदल करणे ही प्रक्रिया अपेक्षित होती तेवढी सोपी ठरलेली नाही. शिवाय झाडांमधून जे 'सिल्क प्रोटीन' तयार होते ते नैसर्गिकरीत्या पाण्यात विरघळणारे असते, असे आढळले आहे. आता या प्रोटीनपासून फायबर कसे तयार करायचे हे कोडे शास्त्रज्ञांना सुटलेले नाही. आणि त्या कोळ्यालाही पाण्यात विरघळणाऱ्या प्रोटीनचे काय करायचे ते माहिती नाही, त्यामुळे शास्त्रज्ञांना निसर्गाकडे धाव घेता येत नाही. तेव्हा आता फायबर विणण्याच्या तंत्रज्ञानात काही बदल करता येतील का ? याचा शोध घेण्यात येत आहे. ■■

## जैवतंत्रज्ञानयुक्त वनौषधी गोळ्यांनी गाईंचे दूध वाढणार

जगभर सर्वत्र उत्पादन वाढण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी जैवतंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. जैवतंत्रज्ञान वादग्रस्त ठरण्याच्या पार्श्वभूमीवर चेन्नई येथील जैवतंत्रज्ञान संशोधक डॉ. सी. के राजकुमार यांनी एक नवीन प्रयोग केला आहे. त्यांनी गाईंचे दूध वाढण्यासाठी व दुधाचा दर्जा सुधारण्यासाठी वनौषधींयुक्त गोळ्या तयार केल्या आहेत. दिवसभरात, दोन रुपयांची एक याप्रमाणे, फक्त दोन गोळ्या गाईंना दिल्या तर गाईचे दूध देण्याचे दिवसाचे प्रमाण किमान दोन ते तीन लिटर्सने वाढते शिवाय गाईच्या दुधातील 'व्हिटामिन ए'चे प्रमाण दुपटीने वाढते. दुधाची किंमत न वाढविता हे करणे शक्य होते. तामिळनाडूमधील काही ठिकाणी हा प्रयोग दूध उत्पादक शेतकऱ्यांनी स्वतः करून याला दुजोरा दिला आहे. विकसनशील देशांमधील महिला व मुले यांच्यातील 'व्हिटामिन ए'ची कमतरता यामुळे कमीतकमी खर्चात व कोणत्याही वाईट परिणामांशिवाय सहज दूर करता येणे शक्य आहे, तसेच यामुळे गाईच्या शरीरावर, मानवी आरोग्यावर व निसर्गावर कोणतेही वाईट परिणाम होत नाहीत, असे डॉ. राजकुमार म्हणतात. या संशोधनासंबंधी प्रसिद्ध संशोधनसंस्थांशी संपर्क साधण्यात येत आहे. ■■

*अर्थबोधपत्रिका* दिनांक :

### सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ..... पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्ट/चेक/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवीत आहे. चेक/ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे..................................................

**(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)**

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ______________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

जिल्हा ____________________ पिन [ ]

## वाचकांना गटचर्चेचे निमंत्रण

**विषय-** 'इंडिया इन द ग्लोबल कॅपिटल मार्केटस् :डेव्हलपमेंट अँड प्रॉस्पेक्टस्'
**दिनांक- रविवार, ९ सप्टेंबर २००१, वेळ-**सकाळी ९.३० ते १२.३०
**स्थळ-** भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,सेमिनार हॉल, 'अर्थबोध', ९६८-२१/२२, सेनापती बापट मार्ग, रत्ना हॉस्पिटलच्या शेजारी, पुणे - ४११ ०१६.
**वक्ते -** *डॉ. प्र. र. जोशी, (पुणे विद्यापीठातून एम्.कॉम केल्यानंतर मुंबई विद्यापीठातून पी.एच.डी,* मर्चन्ट बँकिंग या क्षेत्रातील १२ वर्षांचा व डेव्हलपमेंट बँकिंग या क्षेत्रातील १७ वर्षांचा अनुभव, जागतिक बँकेच्या सल्लागार मंडळावर निवड, गेल्या ३० वर्षांपासून प्रतिष्ठित व्यवस्थापन शिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणात सहभाग, यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद व जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थांचाही समावेश आहे. इकॉनॉमिक टाईम्स (इंग्रजी) व लोकसत्ता (मराठी) या दैनिकांमधून सातत्याने बँकिंग विषयावर लिखाण, राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सहभाग, 'ग्लोबल कॅपिटल मार्केटस्' हे पुस्तक १९९६ मध्ये टाटा मॅकग्रॉ हिल पब्लिकेशनतर्फे प्रसिद्ध)

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अशा चर्चासत्रात सहभागी होण्याच्या दृष्टीने आपल्या आवडीचे विषय - ____________________

____________________

**सूचना** ● चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. **पुण्याच्या बँकेवरीलच चेक मान्य करण्यात येतील.** ●देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे. ●या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतींद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता. ●आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

## माशाची अंडी एक लाख रुपये किलो !

मोठ्या आकाराच्या माशांमध्ये स्टर्जन (sturgeon) नामक प्रकारातील मासे या पृथ्वीतलावर म्हणजे समुद्रात डायनॉसोरच्या काळापासून वास्तव्य करून आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत या माशांच्या संख्येत घट होत गेली व आता तर ते कायमचेच नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याला कारणीभूत आहे मानव. कारण या माशांच्या पोटात असलेली कॅव्हियर (caviar) नावाची अंडी मिळविण्यासाठी मानवाने त्यांना जाळ्यात अडकवून मारण्याचे ठरविले. युरोप, रशिया व इतर उत्तरेकडील देशांमध्ये ही अंडी खारावून खाण्याचे प्रमाण भरपूर आहे. पण हे मासे पकडणे कठीण आहे. व त्यातही, त्यांच्यातील मादी गळाला लागून तिच्या पोटात अंडी असणे ही दुर्मिळ बाब आहे. हे मासे जाळ्यात अडकल्यानंतर ९० टक्के माशांच्या पोटात अंडी नसतातच. त्यामुळेच या अंड्यांची किंमत एका किलोसाठी सुमारे दोन हजार अमेरिकन डॉलर्स (डॉलरचा सध्याचा ४८ रुपये हा दर लक्षात घेता एका किलोस अंदाजे एक लाख रुपये) एवढी आहे.

संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दुर्मिळ जातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत नुकतीच (जून २००१ मध्ये)एक परिषद फ्रान्स येथे झाली. त्यावेळी हे मासे नष्ट होत असल्याची बाब पुढे आली. यानंतर आता या माशांना पकडण्यासंबंधीचे व त्यांना जतन करण्यासंबंधीचे काही नियम ठरविण्यात आले. हे मासे नष्ट का होत आहेत, याचा शोध घेताना असे लक्षात आले की ज्या माशांच्या पोटात अंडी नसतात, त्यांचेही पोट कापून त्यात अंडी आहेत का याचा शोध घेण्यात येतो आणि ९० टक्के मासे या प्रकारात जीवास मुकतात. बहुतेक माशांच्या पोटात अंडी का नसतात याचे कारण असे की, या माशांचे कमाल आयुष्यमान १५० वर्षे असते ( ते सुमारे ६ मीटर लांबीचे व दीड टनापेक्षा जास्त वजनाचे असतात.) आणि त्यांच्यातील प्रजननक्षमता ही फार उशीरा, ६ वर्षापासून २५ वर्षांपर्यंत केव्हाही कार्यक्षम होते. त्यामुळे गळाला लागलेल्या माशाच्या पोटात बरेचदा अंडी नसतात. या परिषदेनंतर अझरबैजान, कझाकिस्तान व रशिया आणि इतर काही देशांनी या माशांना वाचविण्यासाठी मोहिम सुरू केली आहे. पण कायद्याने कितीही बंदी घातली तरी हा अंड्यांचा व्यापार बेकायदेशीररित्या सुरूच आहे. कारण दरवर्षाला अब्जावधी रुपये नफा मिळवून देणाऱ्या उद्योगावर पाणी कोण सोडेल ? (संदर्भ - 'डाऊन टू अर्थ' ३१ जुलै २००१) ■■

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळया विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून अर्थबोधपत्रिका प्रकाशित केली जात आहे.

**- संस्थेचे मंडळ -**

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर

द.ना. धनागरे • आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ

के. एन्. राज • व्ही.एम्.राव • दि.चं. वधवा • सु.म. विद्वांस

ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर